RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १७५ वा मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

## लातूरच्या तीन गावात भूगर्भातून मोठा आवाज अन् जमीन हलल्याचा भास!

# गावकऱ्यांना ३२ वर्षापूर्वीच्या भूकंपाची आठवण

**लातूर/प्रतिनिधी : राज्यातील बहुतांश भागात सध्या पडत असलेल्या पावसाने एकच धुमाकूळ घालत जनजीवन पूर्णत: विस्कळीत केले आहे. या मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला असून यात बळीराजा पुरता हवालदिल झाला आहे. कायम दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्यात अतिवृष्टीने सर्वत्र दाणादाण उडवली असल्याचे चित्र आहे. तर एकीकडे पावसामुळे निसर्गाची अवकृपा झाली असताना याच मराठवाड्यातील निलंगा तालुक्यातील कलांडी खडकउमरंगा आणि डांगेवाडी या गावात एक विचित्र घटना घडली आहे. यात २९ सप्टेंबर रोजी अवघ्या दोन तासांत भूगर्भातून पाच वेळा भयानक आवाज झाल्याने धरणी हलल्याचा अनुभव नागरिकांना आलाय. तर अचानक झालेल्या या घटनेमुळे नागरिकांनी घराबाहेर पळ काढत पावसात रस्त्यावर आश्रय घेतला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, निलंगा तालुक्यातील कलांडी खडकउमरंगा आणि डांगेवाडी या तीन गावात दोन तासांत पाच वेळा भूगर्भात भयानक आवाज आला. परिणामी नागरिक भयभीत होऊन हजारो नागरिक रात्रभर पावसात रस्त्यावर थांबलेत. सध्या संपूर्ण गावात भीतीचे वातावरण असल्याचे चित्र आहे. दरम्यान, आम्ही वारंवार प्रशासनाला माहिती दिली, पण कोणीही गावात फिरकले नाही, असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, या आवाजानंतर जमिनीमध्ये कंप जाणवत असून घरांची भिंती थरथरत आहेत. त्यामुळे गावात अफवांनाही उधाण आले आहे. काहींचे म्हणणे आहे की, हे भूगर्भातील हालचालीमुळे होत असावे, तर काहींनी भूकंपाचा इशारा असल्याची भीती व्यक्त केली.

दरम्यान, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना पसरली असून तातडीने तज्ज्ञांचा अहवाल घेऊन प्रशासनाने गावकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे. त्यामुळे या प्रकरणी आता प्रशासन नेमके काय पाऊल उचलते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

१९९३ साली गणेश विसर्जनानंतरच्या दुसऱ्या दिवशी पहाटे भूकंपाचा धक्का बसला होता. यात हजारो लोकांचे प्राण गेले होते. त्यातच भूगर्भातून मोठा आवाज येत असल्याने कलांडी खडक उमरगा आणि डांगेवाडी गावातील नागरिकांना ३२ वर्षांपूर्वी झालेल्या भूकंपाची आठवण होत आहे. ३० सप्टेंबर १९९३ ची पहाट महाराष्ट्र कधीच विसरु शकत नाही. गणपती विसर्जनानंतरचा दिवस. संपूर्ण महाराष्ट्र साखर झोपेत असताना लातूर जिल्ह्यातील किल्लारी आणि आजूबाजूची गावे भूकंपाने हादरुन गेली. हजारो लोक झोपेतच गाडले गेले. ६.४ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाने सात हजारांपेक्षा जास्त लोकांचा बळी घेतला, १६ हजार लोक जखमी झाले. तर ५२ गावांमधील ३० हजार घरे धरणीच्या पोटात गडप झाली.

## लातूर–उस्मानाबाद भूकंप

# वेदनेचा ठसा, शिकवणुकीचा मार्ग



### जुन्या आठवणी

पहाटेचे अंधारलेले आकाश सर्वत्र पसरलेली निशब्द शांतता आणि अचानक पृथ्वीच्या अंतरंगातून उसळलेला एक प्रचंड कंप! ३० सप्टेंबर १९९३ रोजी लातूर–उस्मानाबाद जिल्ह्यांनी अनुभवलेला हा भूकंप फक्त भूगर्भाचा धक्का नव्हता, तो माणसांच्या हृदयाला चिरून टाकणारा, हजारो स्वप्नांचे अवशेष करणारा महाभयंकर प्रसंग होता.

किल्लारी, उमरगा, तुळजापूर आणि आसपासच्या गावी हजारो जीव क्षणार्धात उद्ध्वस्त झाले. कधी आनंदाने गजबजणाऱ्या वाड्यावस्ती एका क्षणात राखेत बदलल्या. एखाद्या लेकराला कवेत धरून आई जिवंतपणी गाडली गेली, तर काही घरांतील एकाही व्यक्तीचा श्वास उरला नाही. अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांतून फक्त एकच प्रश्न उभा राहिला – हा सर्वनाश का?

परंतु या अंधःकारातही माणुसकीचा दिवा तेजाने पेटला. दूरवरून धावून आलेले सैनिक, स्वयंसेवक, डॉक्टर, पत्रकार, समाजसेवक यांनी जीव धोक्यात घालून मदतीचा हात पुढे केला. अन्न, पाणी, औषधे, रक्त – जे जे आवश्यक, ते देशभरातून ओसंडून आले. दु:खाचे ओझे हलके करणारा हा सहानुभूतीचा प्रवाह आयुष्यभर विसरता येणार नाही. या आपत्तीने शासनालाही जागे केले. पुनर्वसन योजना राबवून गावांची नव्याने उभारणी करण्यात आली. भूकंपरोधी घरे, रुंद रस्ते, नवी वसाहत – सर्व काही नव्याने घडले. जखमा खोल होत्या, पण काळाने त्यावर मलमपट्टी केली. आज अनेक गावं आधुनिक रुपात उभी आहेत; तरीही जुन्या ढिगाऱ्यात हरवलेले जीव व आठवणी कायम वेदना देत राहतात.

या भूकंपाने आपल्याला शिकवले की निसर्गाच्या रौद्र शक्तीपुढे मानव किती क्षुद्र आहे. पण त्याचवेळी त्याने दाखवले की एकत्र येऊन, सज्ज राहून आपण संकटावर मात करू शकतो. भूकंपरोधी घरे, आपत्ती व्यवस्थापनाचे शिक्षण, सजग प्रशासन आणि सजग नागरिक – हेच पुढच्या पिढ्यांना सुरक्षिततेचे कवच ठरू शकते.लातूर–उस्मानाबाद भूकंप हा फक्त इतिहास नाही, तो आपल्याला दिलेला इशारा आहे. विसरण्याची चूक पुन्हा नको. स्मरण ठेवून सज्ज राहणे हेच त्या हजारो निरपराध जीवांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## निलंगा नगरपरिषद कायमसेवकाची सहकारी पत संस्था यांची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**निलंगा/प्रतिनिधी** :निलंगा नगर परिषदेच्या सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा दिनांक २८ /९ /२०२५ रोजी डॉक्टर शिवाजीराव पाटील निलंगेकर सांस्कृतिक सभागृहामध्ये पार पडली. सदरील सभेमध्ये दि. ३१/३/२५ या दिनांक च्या ताळेबंदाचे तसेच या दिनांकास संपणाऱ्या वर्षात नफा तोटा पत्रकाचे लेखापरीक्षण झाल्यामुळे त्याचा अहवाल सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यात आला या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या नफा तोटा व व्याज या बद्दलची सर्व माहिती सभागृहास देण्यात आली. तसेच थकबाकीदाराची वसुली करण्याकरिता सर्व संचालक मंडळांनी मदत करावी तसेच या चालू वर्षांमध्ये सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचे सदरील सभेमध्ये ठरवण्यात आले. सर्वसाधारण सभेची सुरुवात झाल्यानंतर पतसंस्थेविषयीची सर्व माहिती पतसंस्थेचे चेअरमन प्रेमनाथ गायकवाड यांनी सभागृहास दिली तसेच सचिव रमेश कांबळे यांनी पतसंस्थेतील वेळेवर कर्जाची परतफेड केल्यानंतर आपणाला व संस्थेला फायदा होईल याविषयीची माहिती दिली .या सर्वसाधारण सभेस विक्रम शिंदे, सचिन कांबळे ,राजेश जाधव ,गोपाळ सोळुंके ,सुमनबाई सूर्यवंशी इत्यादी संचालक उपस्थित होते तसेच या सर्वसाधारण सभेला पत संस्थेचे सभासदानी उपस्थिती नोंदवून सभा यशस्वी केल्याबद्दल संचालक मंडळ व सर्व सभासदांचे आभार पेटकर तुकाराम यांनी मानले.




## दोन समाजामध्ये व्देषभाव निर्माण करण्याचे उद्देशाने फेसबुकवरुन व्हिडीओ व्हायरल करण्याऱ्याविरुद्ध गुन्हा नोंद

**लातूर/प्रतिनिधी** : लातुर शहरामध्ये दिनांक २४/०९/२०२५ रोजी कानपुर उत्तरप्रदेश येथील घटनेसंदर्भात लातुर शहरात काढण्यात आलेल्या निषेध मोर्चावरुन हिंदु व मुस्लीम समाजामध्ये व्देषभाव निर्माण करण्याचे उद्देशाने फेसबुक सोशल मिडीयाद्वारे अफवा पसविणारा खोटा व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी पो.स्टे. विवेकांनद चौक लातुर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास चालु आहे. अशाप्रकारे सोशल मीडियावर पोस्ट किंवा व्हिडिओ प्रसारित करून दोन गटामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास गुन्हा नोंद करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सर्व ठाणेदारांना दिलेले आहेत. लातुर जिल्ह्यामध्ये दोन समाजात व्देषभावना निर्माण करण्याचे उद्देशाने अथवा त्यांच्या भावना भडकावण्याचे उद्देशाने कोणताही इसम सोशल मिडीयाद्वारे पोस्ट किंवा व्हिडीओ प्रसारित करील त्याचेविरुद्ध कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल तसेच अशा प्रकारचे कोणी सोशल मिडीयाद्वारे पोस्ट किंवा व्हिडीओ प्रसारित करित असल्यास संबधीत पोलीस स्टेशन अथवा सायबर सेल लातुर येथे संपर्क करण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे यांनी केले आहे.

## रिक्षा भाड्यावरून प्रवाशाचे अपहरण करुन खून: दोन तासांत आरोपी निष्पन्न

### अंबाजोगाईच्या शेतातून अल्पवयीन मुलासह रिक्षाचालकास अटक

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरात रिक्षा भाड्यावरून झालेल्या किरकोळ वादातून एका २५ वर्षीय प्रवासी तरुणाची रिक्षाचालकाने चाकू लावून अपहरण करत निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आमेर सय्यद (वय २५, रा. सायगाव, जि. बीड) असे मृताचे नाव असून, तो आपल्या चार सहकाऱ्यांसह गावी जाण्यासाठी लातूरला आला होता. घटनेनंतर अवघ्या दोन तासांत विवेकानंद चौक पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. आमेर सय्यद (वय २५, रा. सायगाव, ता. आंबाजोगाई, जि. बीड) हा तरुण सोलापूर येथे कुशनच्या सीट बनवण्याचे काम करायचा. परंतु सध्या सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्यामुळे त्याचे काम बंद झाले होते. चार जणांसोबत तो नवीन रेणापूर नाका येथे आला. तेथे रिक्षाला भाडे विचारले. यावर समीरने ८०० रुपये लागतील असे सांगीतले. इतक्यात तेथे आणखी एक रिक्षा आली. त्यांनी रेल्वे स्टेशनला सोडण्यास १२० रुपये भाडे सांगीतले. हे सर्वजण रिक्षात बसत असताना माझ्याशी भाडे ठरवून तू त्या रिक्षात का बसतोस असे म्हणून हुज्जत घालून अपहरण करून खून केला. मयताची ओळख पटेना आणि आरोपीही अज्ञात, यामुळे तपास करणे आव्हानात्मक असतानाच विवेकानंद चौक पोलिस ठाण्याच्या डीबी पथकातील खुर्रम काझी, यशपाल कांबळे आणि रवि गोंदकर यांनी आरोपीची माहिती काढली असता आरोपी हा आर्वी शिवारात राहणारा समीर शेख असल्याचे समोर आले. सोबतचा अल्पवयीन मुलगा हा त्याच्या घरमालकाचा असल्याचेही निष्पन्न झाले. सीसीटीव्ही आणि लोकेशन च्या आधारे ताब्यात घेतले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**शालेय महाविद्यालयीन अभ्यासक्रमात आयुर्वेदाचा समावेश...**



**चिमटा दयाचा**

पावसाने केला कहर !<br>
सर्वांना बसली झळ !!<br>
निसर्गाचा कळला खेळ !<br>
या संकटातून<br>
बाहेर पडण्यासाठी<br>
लागणार वेळ !!

# शेतकऱ्यांच्या अडचणीत, संभाजी ब्रिगेड मैदानात

## मा.मंत्री आ.आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन.....

## हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत करावी संभाजी ब्रिगेडची मागणी

**लातूर/मोईज सितारी** : लातूर जिल्ह्यासह निलंगा तालुक्यात तसेच संपूर्ण राज्यांमधे मागील काही दिवसापासून पावसाने थैमान घातले आहे. सर्व नद्यांना सतत महापूराचे स्वरूप आले आहे.सगळीकडे हाहाकार झाला आहे.नदीच्या पुरामुळे नंदिकाठचे पीक पूर्णपणे सडलेले आहे. व इतर उभ्या पिकालाच कोंब फुटायला चालू झाले आहे.पुरामुळे कित्तेक शेतकऱ्याचे पशुधन,शेती आवाजारे शेतकरी या पुराच्या पाण्यात वाहून गेले यामध्ये एक अनेकांचे संसार मोडले अनेकांचा संसार उघड्यावर आला.या अस्मानी संकटामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला. कोलंमडून पडला आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.म्हणून सरकारने तात्काळ शेतकऱ्याच्या संकटकाळात शेतकऱ्याच्या पाठीमागे उभ टाकून शेतकऱ्यांना किमान हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्यावे. ८५०० रुपये हेक्टरी देऊन शेतकऱ्यांची चेष्टा न करता शेतकऱ्यांच्या पाठीशी उभ टाकून भरीव मदत करावी.सद्या सत्तेत असलेले मुख्यमंत्री हेलिकॉप्टरनं येऊन पाहणी करून गेले खरं पण शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळून गेले का असं शेतकऱ्यातून चर्चा पहावयास मिळत आहे म्हणून शासनाने ओला दुष्काळ जाहीर दुष्काळ जाहीर करावा व हेक्टरी एक लाख रुपयाची आर्थिक मदत करून याचा संसार उभा करण्यासाठी हातभार लावावा यासाठी आज संभाजी ब्रिगेडचे माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांना निलंगा येथील निवासस्थानी निवेदन देऊन मुख्यमंत्र्याकडे मागणी करण्यात आली आहे.

मागील अनेक वर्षाचा रेकॉर्ड या पावसाने मोडला असून खरिपाचे पीक हे नासाडी झाली आहे. ऊस आडवे फडून गेले तर तुर पिवळी सोयाबीन उभ्यानेच वापाई चालू झाले आहे. यामध्ये शेतकऱ्याच्या पदरात फक्त निराशाच आहे.तसेच आपण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान आपण शेतकरी कर्जमाफीची आश्वासन जनतेला दिले होते.मात्र सत्तेत आल्यानंतर याचा विसर आपणास पडला आहे. शेतकरी पूर परिस्थितीतून जात आहे सध्या शेतकऱ्याचा कणा मोडला आहे आणि या मोडलेला कण्याला आधार देण्याचे काम सरकारने करावे.कारण महाराष्ट्रात दर दिवशी सरासरी तीन शेतकरी कर्जाच्या विळख्याने आत्महत्या करीत आहेत.है वास्तव आहे.



त्यामुळे तात्काळ बळीराजाला आर्थिक मदत करून हातभार लावावे.

महाराष्ट्रात मराठा धनगर व इतर काही जात समूह आरक्षणाची मागणी करत असून याबाबत समाज बांधव अत्यंत आक्रमक असून त्यांच्या भावनाही अत्यंत तीव्र आहेत सरकारमधील काही आपले प्रतिनिधी व जबाबदार मंत्री या संवेदनशील विषयावर विक्षिप्त विधाने करून वातावरण बिघडवत आहेत जातीतील निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत राज्याचे प्रमुख म्हणून आपण जबाबदारी हा विषय निकाली काढून असे बेजवाबदार बेताल वक्तव्य करणाऱ्यांना तंबी द्यावी. व मराठा ओबीसी व इतर जातीय संघर्ष तीळ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. ऊसाला सहकारी अथवा खाजगी कारखानदार एफआरपीप्रमाणे सात दिवसात उसाची रक्कम देण्यासाठी पारदर्शक कायदा करावा दुधाला ७० रुपये प्रति लिटर भाव द्यावा व होणारी भेसळ थांबवावी अशा आशियाचे निवेदन देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, जिल्हा सचिव इर्शाद शेख, सिद्धेश्वर तेलंगे, शहराध्यक्ष परमेश्वर बोधले, रमेश लांबोटे, तालुकाउपाध्यक्ष सगरे गोविंद, तालुका संघटक परमेश्वर जाधव, कुणाल पाटील, भरत चव्हाण,परमेश्वर नांगरे, जावेद मुजावर, गणपतराव वरवटे, ऋषिकेश निलंगेकर, अफरोज पांढरे,हणमंत सगरे, सुभाष सूर्यवंशी,गौस शेख, शिवदास मोरे अनेक पदाधिकारी व शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दानशुरांनी पुढे यावे

महाराष्ट्रात यापुर्वी पावसाने कहर केला नाही तेवढा यावर्षी बरसला आहे. पाऊस आता थांबावा असे म्हणण्याची वेळी आता आली आहे. पाऊस मोसणाम पडणे व अवेळी पडणे यात फरक आहे. अवेळी पडल्याने मोठे नुकसान होते. यावर्षी चांगला पाऊस खरीप पिकासाठी झाला. धान ही चांगल्याप्रकारे आले. पाऊस उन्हाळ्यात पडला नंतर थोडा-थोडा पडत होता. त्यामुळे खरीपाचे पीक चांगले हाती लागेल असे वाटत होते. त्यात अचानक सप्टेंबर महिण्यात एवढा पाऊस होत आहे की, आता पाऊस बस म्हणण्याची वेळ आली आहे. या पावसाने महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे सर्वाधिक नुकसान केले आहे. त्यात जनावराच्या मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. राज्यातील रस्ते उखडले आहेत. पुले वाहून गेले आहेत. शालेय इमारतीचे नुकसान झाले आहे. ग्रामीण भागातील शेतीतील माती वाहून गेली आहे तसेच कच्चे घरे कोसळली आहेत. एकंदरीत राज्यात फार मोठे नुकसान झाले आहे. अशा स्थितीत सरकार मदत करेल. त्यासाठी राज्याचे प्रमुख असलेले मुख्यमंत्री यांनी देशाचे पंतप्रधानांची भेट घेऊन परिस्थितीची माहिती दिली आहे. त्यामुळे केंद्राकडून काही मदत मिळेल असे वाटते. राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने या संकटावर मात करता येईल व काही प्रमाणात संकट कमी होईल असे वाटते. यावर एकट्याने निसरण करता येईल असे वाटत नाही. केले तर दिर्घ काळ लागेल. तातडीने जर यावर मात करावयाची, पुर्नवसन करावयाचे असेल तर सर्वांनी हातभार लावावा लागणार आहे. सर्वांनी मदत करावी लागेल. त्यामुळे आमदार, खासदार व मंत्री महोदयांनी पुढे आले पाहिजे. त्यानंतर राज्यातील सर्व शासकिय अधिकारी यांचा सहभाग नोंदविला पाहिजे. सर्वांनी एक महिण्याचे वेतन दिले पाहिजे. व्यापारी व उद्योगपती यांनी पुढाकार घेतला पाहिजे. प्रत्येक शहरात मदत फेऱ्या काढण्याचा विचार केला पाहिजे. पावसाचा जोर काही ठिकाणी ओसरत आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांतील काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याने राज्यात पावसाचा अंदाज जारी केला आहे. मुसळधार पावसामुळे, जायकवाडी धरणाचे पाणी ओसंडून वाहू लागण्याची शक्यता असल्याने सोमवारी मराठवाडा भागातील काही जिल्ह्यांतील ११,५०० लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात पुराच्या पाण्यात बुडाल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. जनावरे वाहून गेली आहेत. शेतात माती सुद्धा उरली नाही, माती वाहूल गेली आहे. उभे पिके वाहून गेली आहेत काही ठिकाणी उभ्या पिकात पाणी साचले आहे. अशा स्थितीत शेतकऱ्याचे जगणे कठिण झाले आहे. त्यातल्यात्यात दसरा व दिवाळी ही वर्षातील मोठी सण आहेत. ती कशी साजरी करावी हा मोठा प्रश्न आहे. ज्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते त्यांनी आनंदाचा शिधा सणासुदीच्यावेळी दिला होता, तोही बंद केला आहे. वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असो किंवा गुढी पाडव्याचा सण आदि सणाच्यावेळी आनंदाचा शिधा मिळत होता. आता या संकटाच्यावेळी गव्हू व तांदुळाचे वाटत सुरू केले आहे. केवळ गव्हू व तांदुळावर घर चालेल किंवा भुख मिटेल असे वाटत नाही. बाकी काही संसारात लागते का नाही? याचा विचार केला पाहिजे. एक तर घरात पाणी शिरल्याने होत्या वस्तू पावसाने नष्ट केल्या आहेत. त्यात घरात पाणी शिरल्याने अन्न भिजले आहे. आंथरून-पांघराचे भिजले आहे. घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्यात या संकटावर कशा प्रकारे मात करावयाची हे एक मोठे आव्हान आहे. त्यामुळे प्रत्येकांनी मदतीची गरज आहे. आपल्या परिने मदतीचा हातभार लावला पाहिजे. शक्य तितक्या लवकर मदत दिली जातील तेवढ्या लवकर परिस्थिती सुधारेल. नसता परिस्थिती सुधारण्यात वेळ लागेल तेवढी नाराजकी निर्माण होवू शकते. राज्यात काही व्यक्तींने आपला एक महिण्याचा पगार मदत फंडास जमा करण्याचे जाहिर केले आहे. त्यामुळे सर्वांनी मदत करण्याची गरज आहे. आपल्याला शक्य तेवढी मदतीची गरज आहे. आता सणासुदीचे दिवस असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना एक महिण्याचा पगार द्या.. असे म्हणता येणार नाही. शक्य जेवढे जमेल तेवढी संकटग्रस्तानां मदत करणे आवश्यक आहे. सर्वांच्या मदतीशिवाय अशा संकटावर मात करणे अशक्य आहे. कारण संकट मोठे आहे, निसर्गाचे आहे. निसर्गाचे संकट किती भयाण असेत याचा अंदाज आता आला असेल. असे संकट यापुर्वी अनेकांनी पाहिले नसेल. गावाला पाण्याचा वेढा. पाण्यात आडकलेल्यांना बाहेर काढणे कठिण दिसून येत होते. काहींना हेलीकॉप्टरने बाहेर काढले, काहींना बचाव पथकाने बाहेर काढल्याने पाहिले आहे. मुळात आलिकडे अत्याधुनिक यंत्रणा होती म्हणून जीवित हानी टाळता आली. काही जनावरे वाहून गेली आहेत. आता सर्वांत महत्वाचे काम म्हणजे गावा-गावात रोगराई पसरू न देणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत रोगराई पसरू नये यासाठी स्वच्छता आवश्यक आहे. मेलेली किंवा कुजलेल्याबाबी जाळून टाकल्या पाहिजेत. काही झाले तरी आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. या संकटावर मात करण्यासाठी प्रत्येक शहरातील व्यापारी, उद्योगपती, कारखानदार यांनी मदत करावी. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्याला जमेल तेवढी आर्थिक मदत करावी. मंत्री, आमदार व खासदारांनी आपले एकमहिण्याचे वेतन देण्याचा विचार करावा. आपआपल्या मतदार संघात लोकप्रतिनिधी आहेत त्यांनी ही जबाबदारी स्विकारुन निधी संकलन केले पाहिजे. काही मंडळींनी अन्नधान्याचे किट वाटप करावे. कपडे किंवा अंथरूनपांघरुनाचे वाटत करणारे असेल त्यांनी त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधीशी संपर्क साधुन मदत वाटत केली पाहिजे. तरच शिस्तीचे दर्शन घडू शकेल. काही ठिकाणी मदत कार्य चालू आहे. सरकारने सुद्धा मदतीसाठी अनुदान खात्यात जमा केल्याचे जाहिर केले आहे. सर्वांनी मिळून या निसर्गाच्या संकटावर मात करण्यासाठी पुढे आवश्यक आहे. केवळ सरकार करेल यावर न थांबता प्रत्येकांनी मदत केली पाहिजे.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडून कव्हा व चांडेश्वर येथील अतिवृष्टीग्रस्त शेतीची पाहणी; तात्काळ पंचनाम्याचे निर्देश

**लातूर/प्रतिनिधी :** महिनाभरापासून लातूर जिल्ह्यात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, सोमवार, २९ सप्टेंबर २५ रोजी सकाळी लातूर शहर मतदारसंघातील कव्हा व चांडेश्वर गावास भेट दिली.

**शेतकऱ्यांशी संवाद आणि नुकसानीची पाहणी:**

कन्हेरी महसूल मंडळ अंतर्गत येणाऱ्या कव्हा आणि चांडेश्वर गावात सोयाबीन, तूर आणि ऊस यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आमदार अमित देशमुख यांनी कव्हा येथील शेतकरी पांडुरंग देशमुख व अंबादास देशमुख यांच्या शेतात जाऊन सोयाबीन आणि तूर पिकाची पाहणी केली. तसेच, त्यांनी चांडेश्वर येथील शेतकरी साहेबराव सपाटे यांच्या शेतातील पिकांची पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना केल्या.

**तात्काळ उपाययोजनांचे निर्देश:**

या पाहणीदरम्यान आमदार अमित देशमुख यांनी लातूर शहरानजीकच्या कातपूर तलावाची देखील पाहणी केली. तलावाचे पाणी रस्त्यावर येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून, या संदर्भात तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी संबंधित



अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच त्यांनी प्रभाग क्र. १८ मधील शांतेश्वर नगर येथील रस्त्याची पाहणी करून, त्याचे काम तात्काळ सुरू करण्यास महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनिल पडिले, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, प्रा.गोविंद घार, नायब तहसीलदार- सतीश कांबळे, उपकृषी अधिकारी-ओमप्रकाश चिंताले, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी- श्री.नल्ले, ग्रामपंचायत अधिकारी- सचिन कसबे,मंडळ कृषी अधिकारी आर.आर.येवले, कृषी सहाय्यक सचिन पडंगे, जिल्हा परिषद शाखा अभियंता के. एन. खरोळकर, सुदाम रूकमे, सुंदर पाटील कव्हेकर, उपसरपंच-किशोर घार, सिकंदर पटेल, गोविंद सोंदले, राम स्वामी, चंद्रकांत नलावडे, राजाभाऊ मोरे, जयहिंद पूरी, सुबुद्दीन शेख, महेश नलवडे जीवन गुंजरगे,डॉ.सतीश कानडे,रमेश थोरमोठे पाटील आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते,कव्हा व चांडेश्वरचे ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

# पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाची महापारेषणला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान




**पणजी (गोवा)/प्रतिनिधी :** दि. २९ : पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण गोवा विधानसभेचे सभापती डॉ. गणेश गावकर यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट नियतकालिक, डिजिटल मीडिया इनोव्हेशन्स व कार्पोरेट कम्युनिकेशन एक्सलन्सचा पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

पणजी (गोवा) येथील हॉटेल फर्न कदंबामध्ये आयोजिलेल्या १९ व्या जागतिक संवाद परिषदेमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी अभिनेते व दिग्दर्शक मिलिंद तेंडुलकर, पीआरसीआयचे अध्यक्ष एम. बी. जयराम, डॉ. गीता शंकर, चिन्मयी प्रवीण यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**जनसंपर्क विभाग अग्रेसर**

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस, ब्लॉग) जनसंपर्क विभागाने महापारेषणची सकारात्मक भूमिका लोकांसमोर



ठळकपणे मांडली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून जनसंपर्क विभाग नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

## नागरिकांनी परवान्यानुसार बांधकाम करावे - अभियंते अभिजीत देशपांडे

**लातूर/प्रतिनिधी :**लातूर शहर महानगर पालिका आयुक्त मानसी मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत बांधकाम परवानगी प्रक्रियेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार आता १५० स्केअर मीटरपर्यंतच्या प्लॉटसाठी मान्यताप्राप्त खाजगी अभियांत्याकडून थेट बांधकाम परवाना मिळणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांना परवानगी प्रक्रियेत मोठा दिलासा मिळणार असून बांधकाम परवाने देणे सुलभ होणार आहे.त्यामुळे शहरातील नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाने निर्देशित केलेल्या नियमानुसार बांधकाम परवाने घेऊन बांधकाम करून घ्यावे. यापूर्वी परवाने न घेता बांधकाम केले आहे, त्याचे नियमितीकरण घ्यावे असे आवाहन इंजिनियर असोसिएशन (एसीईए) लातूरचे अध्यक्ष अभिजीत देशपांडे सरसंबेकर यांनी केले आहे. लहान प्लॉटसाठी मनपाकडे दररोज मोठ्या प्रमाणावर बांधकाम परवानगीचे अर्ज येत होते. या अर्जांची छाननी, तांत्रिक तपासणी आणि मंजुरी प्रक्रियेस बराच वेळ लागत होता. त्यामुळे नागरिकांना परवाना मिळण्यात विलंब होत होता. या अडचणी दूर करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे आयुक्त मीना यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र शासनाने सन २०२० मध्ये केलेल्या तरतुदीनुसार एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार ३०० मीटर पर्यंतचे परवाने खाजगी अभियंत्यांना अधिकार देण्याबाबत बैठक होऊन सदरचा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला. यामध्ये ३०० चौरस मीटरवर बांधकाम करण्यासाठी महानगरपालिका मिटर क्षेत्रफळावर बांधकाम हद्दीत कमी जोखीम व मध्यम जोखीम अशा दोन प्रकारात बांधकाम परवाना प्रक्रिया सुलभकरण्यासाठी तत्कालीन राज्य शासनाने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली आणली. पाच वर्षांपूर्वी आलेल्या या नियमावलीतील तरतुदीनुसार ३०० चौरस मिटरपर्यंतचे बांधकाम शासनाने सन २०२० मध्ये केलेल्या तरतुदीनुसार एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार ३०० चौरस मिटरपर्यंतचे बांधकाम परवाने खाजगी अभियंत्यांना देण्याची परवानगी देण्याबाबत विचार मंथन करण्यात आले. त्यामुळे आता १५० स्केअर मीटरपर्यंतच्या प्लॉटधारकांना खाजगी अभियांत्याकडून नकाशा तयार करून थेट बांधकाम परवाना घेता येईल. या निर्णयामुळे परवाना प्रक्रियेत पारदर्शकता वाढेल, प्रशासनावरील ताण कमी होईल तसेच नागरिकांना वेगवान सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. शहरातील सामान्य नागरिक, गृहविकास करणारे व लहान प्लॉटधारकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. आधी परवानगी मिळवण्यासाठी महिनोंमहिने वेळ लागत होता, आता प्रक्रिया जलद व सोपी झाली आहे,अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. या निर्णयामुळे लातूरमधील बांधकाम परवाना प्रक्रिया आता सुलभ, पारदर्शक व लोकाभिमुख होणार आहे.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर तर्फे मोफत अरोग्य शिबीराचे उदघाटन

लातूर/प्रतिनिधी : दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत नवरात्री निमित्त आई भवानीच्या दर्शना साठी तुळजापुर येथे पायी जाणाऱ्या सर्व भाविक भक्तानां निशुल्क आरोग्यसेवा व मोफत औषधी पुरविण्या साठी औसा तुळजापूर मोड़ येथे महाविद्यालया तर्फे ''मोफत अरोग्य शिबीर'' चे आज प्रमुख




अतिथि लातूरचे सुपरिचित बालरोगतज्ञ् व दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ.सुरेश भट्टड व दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राचर्या डॉ.क्रांती सातपुते यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.या प्रसंगी महाविद्यालयातील रा.से.यो. विभागप्रमुख प्रा.वाघमारे राहुल,प्रा.शेख मुहज़्ज़िब हुसेन,प्रा.अंजली साबणे आणि या सेवे साठी निःशुल्क जागा उपलब्ध करुन देणारे रिजवान पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

उदघाटन प्रसंगी बोलताना डॉ. सुरेश भट्टड यांनी अशा प्रकारच्या शिबिरांमुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना वेळेवर प्राथमिक उपचार मिळतात, हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.पायी चालताना भक्तांना अनेक किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. या दरम्यान त्यांना पाय दुखणे, सूज येणे, मांसपेशींना जखमा होणे, थकवा, चक्कर येणे किंवा अंगदुखी यांसारख्या तक्रारी संभवतात. त्यामुळे अशा भाविकांसाठी ब्लड प्रेशर तपासणी, शुगर (डायबेटीस) तपासणी व हिमोग्लोबिन तपासणी यांची नितांत गरज असते. ही गरज या आरोग्य शिबिराच्या माध्यमातून पूर्ण होत आहे, याचा मला मनस्वी अभिमान वाटतो. तर प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागाच्या विद्यार्थ्यांनी समाजासाठी घेतलेली ही सेवा हीच खरी शिक्षणाची पूर्तता असल्याचे मत व्यक्त केले आणि मान्यवर संस्थाचालकांनी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहन व सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

हा उपक्रम दि. २८ रोजी रोजी हनुमान मंदिर रेणापूर फाटा येथे तर २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर रोजी पर्यंत औसा तुळजापूर मोड़ असा आहे.या शिबिरात तुळजापुर व रेणापूर येथे दर्शना साठी पायी जाणाऱ्या भक्तानां निशुल्क ब्लड प्रेशर,हीमोग्लोबिन चेकअप,डाईबेटिस चेकअप,वजन तपासणे,सर्दी,खोकला,अंगदुखी,व जखमा होणाऱ्या पेशेंट्स ची तपासणी करण्यात येईल व त्यांना मोफत औषधे दिली जात आहेत.महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनात मोफत औषधे वाटप व इतर तपासण्या करण्याचे काम चालू आहे.या चार दिवसात किमान १००० नागरिक प्रथमोपचाराचा,इतर तपासण्यांचा आणि मोफत औषध गोळ्यांचा या सेवेचा लाभ घेतील असा अनुमान आहे.अशी माहिती रा.से.यो. वि.प्रमुख प्रा.वाघमारे राहुल यांनी दिली.या समाज उपयोगी शिबिरात महाविद्यालयातील एन.एस.एस स्वयंसेवक विद्यार्थी,विद्यार्थिनी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी राहुल खंडागळे यांनी परिश्रम घेतले.


महाविद्यालया तर्फे राबविल्या जात असलेल्या समाजोपयोगी उपक्रमा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा यांनी प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, कार्यरत प्राध्यापक वृंद, कर्मचारी व संपूर्ण रा.से.यो. टीम चे अभिनंदन केले आहे.

# नैसर्गिक संकटात राज्यशासन शेतकऱ्यासह जनतेच्या पाठीशी

## आमदार रमेशआप्पा कराड यांनी पूर्व लातूर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून जाणून घेतल्या व्यथा

लातूर/प्रतिनिधी : लातूर तालुक्यातील पूर्व भागातील विविध गावांना भेटी देवून भाजपाचे नेते आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी सततचा मुसळधार पाऊस, अतिवृष्टीमुळे आणि नद्यांना आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या शेतीची त्याचबरोबर विविध ठिकाणच्या लोकवस्तीची पाहणी केली. शेतकरी, ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून त्यांच्याशी चर्चा करून व्यथा जाणून घेतल्या. राज्यातील महायुतीचे शासन आपल्या पाठीशी आहे नुकसान ग्रस्तांना निश्चितपणे मदत केली जाईल असा धीर आ. कराड यांनी दिला.





लातूर ग्रामीण मतदार संघातच नव्हे तर सबंध जिल्हाभरात प्रचंड अतिवृष्टी झाली, अनेक ठिकाणी ढगफुटी सारखा पाऊस झाला. यामुळे नदी नाल्या ओसांडून वाहत आहेत. मुसळधार पावसाने आणि सततच्या अतिवृष्टीमुळे खरिपाची हाताशी आलेली सोयाबीन, तूर, मूग, ऊस या पिकासह अनेकांच्या फळबागा पाण्यात गेल्या. शेतात जिकडे बघावे तिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती निर्माण झाली. तर मांजरा, रेणा नदीसह छोटे नाले, ओढे यांना प्रचंड पूर येऊन नदीनाल्याकाटच्या आणि सखल भागातील शेतीचे प्रचंड नुकसान झाले. अनेक ठिकाणच्या शेत जमिनी खरडून गेल्या. काही वस्त्यातील घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले या सर्व लातूर तालुक्याच्या पूर्व भागातील नुकसानीची पाहणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी रविवारी केली.

या दौऱ्यात लातूर तालुक्यातील मौजे खुलगापूर, कासारखेडा, कोळपा, भातखेडा, ममदापूर, बोरी, मुशिराबाद, सलगरा आणि उमरगा या गावांना भेटी देऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी मांजरा नदीकाठच्या शेतीची आणि पावसाने नुकसानग्रस्त झालेल्या शेतीची, पाणी शिरलेल्या घरांची आणि ओढे नाल्यावरील नुकसान झालेल्या लहान मोठ्या पुलांची आणि रस्त्याची त्याचबरोबर मौजे खुलगापूर येथील पाण्याने वेढलेल्या जिल्हा परिषद शाळेची पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. या पाहणी दौऱ्यात लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, तालुका कृषी अधिकारी येवले, जि.प. बांधकाम विभागाचे कुलकर्णी, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सतीश आंबेकर, पांडुरंग बालवाड, विजय मलवाडे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, शरद दरेकर, उद्धव काळे, महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, मारुती शिंदे, संजय सावंत, रवींद्र पाटील, शेख अहमद यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व इतर अनेक जण होते.

पाहणी दौऱ्याच्या निमित्ताने ठिकठिकाणी शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या अतिवृष्टीमुळं शेतकऱ्याच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावला आहे. शेतकरी अन् सर्वसामान्य नागरिकही संकटाच्या कचाट्यात सापडले आहेत. राज्यातील महायुतीचे सरकार आपल्या पाठीशी असून झालेल्या नुकसानपोटी सर्व शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात येणार आहे. नदी नालेकाठच्या खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यात येणार असून शासनाच्या मदतीपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या. आ. कराड यांच्या पाहणी दौऱ्याप्रसंगी त्या त्या गावातील आदिनाथ मुळे, लक्ष्मण नागिमे, सोमनाथ वाघमारे, लक्ष्मण मुळे, रुपेश काळे, लिंबराज बोळंगे, हनुमंत गव्हाणे, रुपेश थोरमोठे, पुंडलिक बेंबडे, नेताजी रणखांब, बालाजी जाधव, साहेबराव नवल, सतीश बिराजदार, सुरेश पाटील, अशोक बिराजदार, धनराज शिंदे, सरपंच कमलबाई शिंदे, दत्तात्रय गडदे, नंदकुमार थोरात, चंद्रकांत पासमे, पद्माकर शिंदे, ज्ञानोबा शेळके, दिलीप शिंगडे, राजेंद्र बनसोडे, पद्माकर गव्हाणे, गोवर्धन स्वामी आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह शेतकरी नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

# माता शैलपुत्रीच्या आवडत्या फुलाचे रोप नवरात्रीत घरात नक्की लावा



माता शैलपुत्रीच्या आवडत्या फुलाचे रोप नवरात्रीत घरात नक्की लावा, देवीच्या आशीर्वादाने घरात भरभराट होईल. आजपासून शारदीय नवरात्रीला सुरुवात झाली आहे. देवीच्या नऊ रुपांची वेगवेगळ्या दिवशी पूजा केली जाईल. पहिला दिवस देवी शैलपुत्रीला समर्पित आहे. या देवीला जाईची फुले आवडतात. देवी शैलपुत्रीला ही फुले अर्पण केल्याने आनंद, शांती आणि स्थिरता यांचा लाभ होतो. आपल्या घरी जाईचं झाड लावण्यासाठी काही ट्रिक्स फॉलो कराल तर रोप छान बहरेल.

रोपासाठी माती अशी लावा

चांगली निचरा होणारी माती निवडा. हवे असल्यास, तुम्ही बागेच्या मातीत कंपोस्ट , गांडूळखत किंवा इतर सेंद्रिय पदार्थ मिसळू शकता. वाळू टाकल्याने देखील माती सैल होण्यास मदत होते. कोकोपिट सुद्धा वापरू शकतात.

रोप वाढवण्यासाठी

चमेलीच्या वेगवेगळ्या जाती आहेत; काही रात्री फुलतात तर काही दिवसा फुलतात. तुमच्या आवडीनुसार तुम्ही नर्सरीमधून रोप खरेदी करा. आता, १२ ते १४ इंचाचे कुंडी घ्या आणि त्यात माती मिसळल्यानंतर ते कुंडीत लावा. रोप जमिनीत घट्ट गाडले आहे याची खात्री करा. नंतर त्याला पाणी द्या.

फुले नसल्यास काय करावे ?

आता, जर तुमच्या झाडाला फुले आली नाहीत, तर फांद्या एक इंच मागे घ्या. यामुळे नवीन फांद्या वाढतील, ज्यामुळे झाड अधिक दाट होईल. तसेच, झाडातील वाळलेली पानं, वाळलेल्या फांद्या हे काळजीपूर्वक काढा, झाडापासून दूर करा.

कोणत्या खताचा वापर करावा ?

एक ते दोन मूठ गांडूळखत आणि कडुलिंबाची पेंड घ्या. याव्यतिरिक्त, वाळलेल्या केळीच्या साली आणि कांद्याच्या साली बारीक करा. हे सर्व घटक पूर्णपणे मिसळा आणि नंतर महिन्यातून एकदा माती मशागत केल्यानंतर ते रोपात घाला. इच्छित असल्यास, तुम्ही दर १५ दिवसांनी पुन्हा केळीच्या सालीची पावडर घालू शकता. यामुळे फुलांची संख्या झपाट्याने वाढेल.

रोपासाठी आवश्यक गोष्टी

रोपाला थेट सूर्यप्रकाशात ठेवा, जर त्याला सूर्यप्रकाश मिळाला नाही तर फक्त पाने वाढतील आणि फुले येणार नाहीत. पावसाळ्यात माती खणून काढा, परंतु काळजीपूर्वक ते करा, अन्यथा मुळे खराब होतील. रोपातील ओलावा संतुलित करून, फुले जास्त काळ फुलतात. जेव्हा झाडात कळ्या तयार होऊ लागतात, तेव्हा माती सुकल्यावर पाणी द्या.

# हृदय निरोगी ठेवण्यासाठी ....



मुंबई : आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हृदयविकार हा एक सामान्य आणि चिंताजनक आजार बनला आहे. वयोगट कोणताही असो, हृदयविकाराचा झटका कोणालाही, कुठेही आणि कधीही येऊ शकतो. त्यामुळे या आजाराची लक्षणं ओळखणे जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच हृदय मजबूत ठेवण्यासाठी योग्य आहार घेणेही गरजेचे आहे. हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी काही विशेष बियांचे सेवन उपयुक्त ठरते. या बिया शरीराला आवश्यक असलेले पोषणद्रव्य, फायबर्स, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, ॲंटीऑक्सिडन्ट्स आणि अन्य महत्वाची तत्त्वे पुरवतात, जे हृदयासाठी हितकारक असतात. चला जाणून घेऊया कोणत्या बिया हृदयविकार टाळण्यास मदत करू शकतात: १) भोपळ्याच्या बिया भोपळ्याच्या बियांमध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. हे पोषक तत्त्व रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते आणि त्यामुळे स्ट्रोक किंवा हृदयविकाराचा धोका कमी होतो. २) सूर्यफूल बिया या बियांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. हे पोषक घटक रक्तदाब कमी करण्यास, कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखरेचा स्तर संतुलित ठेवण्यास मदत करतात. ३) चिया सिड्स चिया सिड्स हे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सचा उत्तम स्रोत आहेत. हे बिया नियमित घेतल्याने शरीरातील खराब कोलेस्टेरॉल (डख्छ) आणि ट्रायग्लिसराईड्सची पातळी कमी होते, त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. ४) तीळ तीळ हे हृदयासाठी लाभदायक असून ते कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात. रोज एक चमचा तीळ सेवन केल्यास हृदयाचे आरोग्य सुधारते. ५) अळशीच्या बिया अळशीचे दाणे मॅग्नेशियमने भरलेले असतात आणि त्यात लिनोलिक ॲसिडसुद्धा आढळते.

# भारत-पाक आशिया चषक क्रिकेटनीती







आशिया चषक स्पर्धेत भारताने काल पाकिस्तानचा पाच विकेट्स राखून पराभव केला आणि ट्रॉफीवर नाव कोरले. आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात तिलक वर्माचे अर्धशतक आणि फिरकीपटू कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांच्या जोरदार कामगिरीच्या जोरावर भारताने पाकिस्तानला रोमहर्षक सामन्यात पाच विकेट्सनी पराभूत केले. टी-२० चषकाच्या स्पर्धेतील भारताचा हा दुसरा किताब आहे. भारताने पाकला माफक १४७ धावांवर बाद केल्यावर भारताने दोन चेंडू राखून पाकचे हे माफक आव्हान परतवून लावले. पण या स्पर्धेत भारताचा विजय हा ठरलेलाच होता आणि पाककडे ना खेळण्याची जिद्द होती, ना त्यांच्याकडे लढण्याची क्षमता. कारण 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत पाकमधील संबंध अत्यंत खराब झाले आहेत आणि त्यामुळे तसेही या सामन्यांना कुणी प्रेक्षक नव्हते. पूर्वी भारत-पाक सामने असले, की थाऊजंड मेगाव्होट्सची लढत असायची. पाकिस्तानचे प्रेक्षक आपले रेडिओ फोडून टाकायचे आणि टीव्ही सेट्स तोडून टाकायचे. पण आजकाल सामन्यात पाकच्या देशद्रोही कारवायांबद्दल इतका संताप निर्माण होत आहे, की काल सामना कधी होता आणि कधी संपला हेही कुणाला कळले नाही. कारण पाकच्या मांडीवर बसून सशस्त्र कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांनी भारतातील निरपराध नागरिकांना कंठस्नान घातले आहे आणि त्यामुळे त्या देशाविरोधात एक प्रकारे राग आणि संताप सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाला आहे. पण क्रिकेट हे क्रिकेट आहे हे लक्षात घेऊन भारताने सामने तर खेळले पण पाकविरोधात संताप खेळाडूंनी व्यक्त केला आणि तो पाकच्या पराभवातच दिसून आला. या सामन्यात मैदानावर जे नाट्य घडले त्यापेक्षा जास्त सामन्यानंतर घडले. त्यावरून भारताचा पाकवर राग आणि संताप दिसून येतो. तसेच पहेलगाम हल्ल्यात ठार झालेल्या निरपराध विधवांच्या कपाळावरचे कुंकू पुसले गेल्याचा प्रत्येक भारतीयाच्या मनात कसा राग धुमसत आहे हे यावरून लक्षात येते.

सामना पार पडला तो दुबईला आणि त्यानंतर पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे प्रमुख मोहसीन नकवी हे तर चक्क आशिया चषक घेऊन पळाले असा आरोप केला जात आहे. आता भारताने अशी मागणी केली आहे, की पाकने हा चषक ताबडतोब परत द्यावा. त्यानुसार ते देतीलही. या सामन्यानंतरच्या काळात इतके नाट्य घडले की एखादी वेब सीरिज त्यावरून सहज तयार करता येऊ शकेल. भारतीय संघ आपल्या विजयोत्सवात मग्न असताना पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा आपल्या खेळाडूंना घेऊन ड्रेसिंग रूममध्ये जाऊन बसला आणि त्याने स्वतःला बंद करून घेतले; परंतु सामन्यानंतरच्या कार्यक्रमात संपूर्ण गोंधळ दिसत होता. यावरून हे दिसत होते, की भारताने पाकला चारो खाने चित केल्यानंतर पाकमध्ये किती संताप व्यक्त होत आहे. अर्थात पाककडे काही साजरे करण्यासारखेच नव्हते. यात आणखी एक वैशिष्ट्य असे होते, की पीसीबी क्रिकेट प्रमुखांकडून आशिया चषक स्वीकारण्यास भारताची तयारी नव्हती. त्यामुळे भारताचा संताप मैदानावर दिसला, तसाच तो मैदानाबाहेरही दिसला. कारण नकवी हे पाकचे अंतर्गत मंत्रीही आहेत आणि त्यांच्यामुळे पाकच्या दहशतवाद्यांना पाठिंबा मिळतो असाही प्रवाद आहे.

भारताने आशिया चषक जिंकूनही भारताने पाकिस्तानचा सहभाग असलेली ट्रॉफी स्वीकारली नाही याला आंतरराष्ट्रीय जगात अनेक अर्थ आहे. एक म्हणजे पाक अजूनही भारतासाठी दहशतवादी राष्ट्र आहे आणि त्याचा पुरता बीमोड केल्याशिवाय भारत स्वस्थ बसणार नाही.

पंतप्रधान मोदी यांनी सामन्यावर एका शब्दात भाष्य केले आहे, ते म्हणजे 'क्रीडा क्षेत्रात ऑपरेशन सिंदूर', तर अमित शहा यांनी एक शानदार विजय असे म्हटले. नंतरच्या नाट्यावर बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी नंतर ट्वीट करत सांगितले, की खेळाडूंनी अगोदरच ठरवले होते, की ट्रॉफी जिंकली तरी पाककडून स्वीकारायची नाही आणि हा निर्णय खेळाडूंनी पाळला. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने आपले सर्व मानधन पहेलगाम हल्ल्यातील विधवांना देण्याचे जाहीर केले. यापूर्वी कधीही असे वाद झाले नव्हते पण यंदाची परिस्थिती अशी होती, की वाद होणारच होता. तो झाला आणि त्यात भारतीयांनी आपण कुठेही देशभक्तीत कमी नाही हे दाखवून दिले. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने पाक खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता आणि त्यामुळे तो वादही गाजला होता. तसे तर भारत-पाक म्हटला, की कुठेही वाद होतातच. कारण पाकची पार्श्वभूमीच तशी आहे. त्यामुळे यंदा भारत-पाक सामने खेळवूच नये अशी एक चर्चा होती, पण तसे असते तर भारत-पाकिस्तानला घाबरतो असे नाव सर्वत्र गेले असते.

तसे न होऊ देता भारताने सामने जिंकूनही पाककडून करंडक स्वीकारला नाही.

भारत आणि पाक यांच्यात गेली काही वर्षे सामने होत नाहीत. त्याला कारण आहे, ते म्हणजे दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरही दोन्ही देशांमध्ये अनेक मुद्द्यांवर तणाव आहे. तो सीमेवरून जसा आहे तसाच तो काश्मीर प्रकरणावरूनही आहे.

भारताने पाकला युद्धात जसे तीनदा हरवले, तसेच अलीकडच्या क्रिकेट सामन्यात पाकला मैदानावर हरवले आहे. त्यामुळे पाकला भारताचे वर्चस्व सहन होत नाही. त्यात भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे तर पाक अजूनही चाचपडतो आहे. वास्तविक दोन्ही देश एकाच वेळी स्वतंत्र झाले. पण पाकने आपली सारी ऊर्जा भारतातील निरपराध नागरिकांना ठार मारण्यासाठीच खर्च केली. पाकचा भारताविषयीचा द्वेष हा सर्व स्तरांना स्पर्श करून जातो. याच वैराचे आणखी एक प्रात्यक्षिक काल दिसले.

## अल्झायमर समजून घेताना... | डॉक्टर टीप्स



**अल्झायमर प्रतिबंध**

- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो.ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.

**अल्झायमरग्रस्तांना समजून घेताना...**

- या आजारावर निश्चित वैद्यकीय औषधे अद्याप नाहीत. काही औषधांचा वापर केला जातो, पण उपयोग मर्यादित आहे. याशिवाय अधिक संशोधन सुरू आहे. - घरातील इतर व्यक्तींवर या आजारी माणसाची विशेष जबाबदारी येऊन पडते, त्यांनी संवेदनेने या रुग्णांना समजून घ्यायला हवे.- सुरक्षितता : आजुबाजूची खोली, वस्तू, व्यवहार सुरक्षित होतील अशी काळजी घ्यायला हवी.

## विनोद




गिऱ्हाईक : मी एक चूक केली.

वेटर : काय झाले साहेब?

गिऱ्हाईक : तुला 'टिप' द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.

वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## संदेश

Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi,
1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## सुविचार



राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.


**– अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

२. रावण
५. सामाजिक नातेसंबंध
९. आश्रय
१२. चुकीचा अर्थ लावणे, गैरअर्थ
१३. वस्ती
१४. ग्रामीण बोलीत पुष्कळ, चिक्कार
१६. नंतर
१७. द्युतात हरल्यामुळे पांडवांना झालेली शिक्षा
२०. रम्य
२१. दाटी
२२. सुदैवी
२३. पुत्र
२५. नूतन
२६. भाकरीबरोबरचे लोकप्रिय कालवण
२८. भातलावणीसाठी तयार केलेले खड्डे
२९. वस्त्र
३३. रस्ता
३४. जनानखाना
३६. श्रावणात याची सार्वधिक पूजा होते
३७. क्रोध
३९. गाढव
४१. व्यापारी
४३. प्रजा
४५. पराभव
४६. खोटा, कृत्रिम
४८. सुखद गार
४९. निष्णात
५०. श्रीरामाची पत्नी
५१. गुंड
५२. खोट्याचा डाव
५२अ.प्रयत्न
५४. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती
५६. बेडूक
५८. दीप
५९. तमाशा
६१. पायपीट
६२. हल्ली
६३. पुष्पपराग
६५. चपखल प्रत्युत्तर देणारा
६७. वेतन
६९. श्रीमंत
७०. गाठोडे
७३. तांबडा
७४. देऊळ
७५. अविवाहित पुरुष
७७. ख्रिस्ती प्रार्थनास्थान
७८. समशेर
७९. विलंब
८०. टोमणा

## उभे शब्द

१. सूर्य
२. खलाशी
३. शिक्षा
४. काम होण्यासाठी देवाशी करार
५. सोशिक
६. मारला गेलेला
७. नवरामुलगा
८. गाव
१०. प्रसंगावधान
११. संताप
१५. भागाबाईला नाचवणारे वाद्य
१८. शिवभक्तांचे मुख्य तीर्थस्थान, बनारस
१९. सुगंध
२१. तंबोऱ्याचे वेष्टन
२४. होडी
२५. दसऱ्याआधीचा उत्सव
२७. विहीर
३०. भ्रतार
३१. अनुभव, प्रचीती
३२. धाक
३३. उत्सवाचा दिवस
३५. पतीचे घर
३७. अरिष्ट
३८. कुशल
४०. घाबरलेला
४२. जादूगाराची पिशवी
४४. सुरुवात
४५. वस्त्र विणण्याचे साधन
४६. वेलींचा मांडव
४७. हात राखून खर्च करणे
४८. ईदचे मिष्टान्न
५२. नेहरूंचे नाव
५३. अकबराच्या दरबारातील नऊ कर्तबगार
५५. बंदुकीची गोळी
५७. नेत्रांजन
६०. सळई
६१. ताकीद
६४. पाण्यातील सजीव
६६. पुन्हा पुन्हा
६८. वाहन
७०. पत्नी
७१. असंमती
७२. उपासना
७४. देशातच तयार झालेले
७६. भस्म

## आडवे उत्तर

२.दशानन ५.सहजीवन ९.आसरा १२.विपर्यास १३.वसाहत १४.रगड १६.मग १७.वनवास २०.रमणीय २१.गर्दी २२.नशीबवान २३.सूत २५.नव २६.झुणका २८.खाचर २९.वसन ३३.सडक ३४.राणीवसा ३६.सत्यनारायण ३७.संताप ३९.रासभ ४१.वाणी ४३.रयत ४५.हार ४६.लटका ४८.शीतल ४९.पारंगत ५०.सीता ५१.टग्या ५२.रडी ५२अ.जतन ५४.माका ५६.मंडूक ५८.दिवा ५९.वग ६१.तंगडतोड ६२.सध्या ६३.रज ६५.हजरजवाबी ६७.पगार ६९.मालदार ७०.बासन ७३.लाल ७४.देवालय ७५.कारा ७७.चर्च ७८.करवाल ७९.उशीर ८०.कोपरखळी

## उभे उत्तर

१.सविता २.दर्यावर्दी ३.शासन ४.नवस ५.सहनशील ६.हत ७.वर ८.नगर १०.समयसूचकता ११.राग १५.डमरु १८.वाराणसी १९.सुवास २१.गवसणी २४.तर २५.नवरात्र २७.आड ३०.नवरा ३१.प्रत्यय ३२.दरारा ३३.सणवार ३५.सासर ३७.संकट ३८.पटू ४०.भयभीत ४२.पोतडी ४४.आरंभ ४५.हातमाग ४६.लतामंडप ४७.काटकसर ४८.शीरकुरमा ५२.जवाहरलाल ५३.नवरत्ने ५५.काडतूस ५७.सुरमा ६०.गज ६१.तंबी ६४.जलचर ६६.वारंवार ६८.गाडी ७०.बायको ७१.नकार ७२.अर्चना ७४.देशी ७६.राख



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकच्या अबरार अहमदला भारताच्या क्रिकेटर्सनी त्याच्याच भाषेत दिले उत्तर

दुबई: आशिया कप २०२५ च्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव केल्यानंतर मैदानावरील विजयाचा जल्लोष बराच वेळ सुरू होता. या दरम्यान भारतीय खेळाडूंनी केलेल्या एका कृत्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.



या व्हिडिओमध्ये संजू सॅमसन, जितेश शर्मा, अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा हे खेळाडू पाकिस्तानी गोलंदाज अबरार अहमदच्या गोलंदाजीच्या क्शनची नक्कल करताना दिसत आहेत. नेमकं काय घडलं? सामना जिंकल्यानंतर खेळाडू ड्रेसिंग रूमकडे परत जात असताना हे खेळाडू मस्ती करताना दिसले. त्यांनी पाकिस्तानी गोलंदाज अबरार अहमदच्या गोलंदाजीची नक्कल करत त्याची क्शन केली आणि जल्लोष साजरा केला. अबरार अहमदने या सामन्यात दोन विकेट्स घेतल्या होत्या. या कृतीचे कारण: वास्तविक, अबरार अहमदने या सामन्यात भारताच्या काही फलंदाजांना लवकर बाद केले होते. कदाचित त्याच्या गोलंदाजीमुळे भारतीय फलंदाजांना थोडा त्रास झाला असावा. त्यामुळेच विजयानंतर भारतीय खेळाडूंनी अबरारची नक्कल करत त्याला एक प्रकारे उत्तर दिले. हा एक प्रकारचा ङ्गमजाकफ असल्याचे मानले जात आहे. वाद आणि चर्चा: क्रिकेटच्या मैदानावर प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूंची नक्कल करणे किंवा त्यांची खिल्ली उडवणे हे नवीन नाही.

***

### वर्ल्डकपमध्ये आमनेसामने येणार भारत–पाकिस्तान

कोलंबो: क्रिकेट चाहत्यांसाठी एक मोठी आणि रोमांचक बातमी आहे. आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ (खउउ थोशपफ़ि जऊख थीींश्रव उीि २०२५) मध्ये भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी संघ पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. ही बहुप्रतिक्षित लढत येत्या रविवारी, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीलंकेतील कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळ–



वली जाणार आहे.थरार पुन्हा एकदा–महिला विश्वचषक स्पर्धेला आजपासून (३० सप्टेंबर २०२५) सुरुवात होत आहे. स्पर्धेतील भारताचा पहिला सामना यजमान श्रीलंकेविरुद्ध बंगळूरु येथे होणार आहे. यानंतर चाहत्यांचे डोळे लागले आहेत ते ५ ऑक्टोबरच्या सामन्याकडे.

भारत–पाकिस्तान लढतीचा इतिहास–महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे वर्चस्व राहिले आहे. भारत आणि पाकिस्तान महिला संघात आतापर्यंत ११ एकदिवसीय सामने झाले आहेत आणि या सर्व सामन्यांमध्ये भारताने विजय मिळवला आहे. त्यामुळे पाकिस्तानला भारताविरुद्ध विश्वचषकात पहिला विजय मिळवण्याची संधी असेल.दुपारी ३ वाजता होणार सुरुवात–कोलंबो येथे होणारा हा हाय–व्होल्टेज सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३.०० वाजता सुरू होईल.

***

### अर्शदीप सिंगविरोधात पाकची आयसीसीकडे तक्रार

दुबई : भारत आणि पाकिस्तान यांच्यात रविवारी आशिया



चषकाचा अंतिम सामना झाला. मात्र या अंतिम सामन्याआधी पाकिस्तानची पुन्हा रडारड सुरु झाली होती.पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आता भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगविरोधात आयसीसीकडे तक्रार दाखल केली. अर्शदीप सिंगने अश्लील हावभाव केल्याचा आरोप पाकिस्तानकडून करण्यात आला त्यामुळे आयसीसीकडून अर्शदीपवर कोणती कारवाई केली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, याआधी देखील पाकिस्तानकडून भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्शदीप सिंगविरुद्ध ज्या घटनेबद्दल तक्रार दाखल करण्यात आली आहे, ती घटना २१ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सुपर फोर सामन्यादरम्यान घडली. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या म्हणण्यानूसार, अर्शदीप सिंगने त्या सामन्यादरम्यान प्रेक्षकांकडे पाहून अश्लील हावभाव केले. अर्शदीप सिंगने सदर कृत्य करुन आयसीसीच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचं पाकिस्तानने म्हटलं आहे.तसेच याप्रकरणी अर्शदीप सिंगवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने केली आहे. दरम्यान, अर्शदीप सिंगपूर्वी पीसीबीनेही सूर्यकुमार यादवविरुद्ध तक्रार दाखल केली होती.

## विजेत्या भारतीय संघाला मिळणार मोठं बक्षीस

मुंबई : सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने आशिया चषक २०२५ ही टी २० क्रिकेट स्पर्धा जिंकली. भारताने सलग नवव्यांदा आशिया चषक जिंकला. यंदा भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानचा पराभव केला. भारताने पाकिस्तान विरुद्धचा अंतिम सामना पाच विकेट राखून जिंकला. भारतीय संघाने यंदाच्या स्पर्धेत साखळी फेरीत, सुपर फोर फेरीत आणि अंतिम फेरीत असे तीन वेळा पाकिस्तानला हरवले. क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताने तीन वेळा पाकिस्तानचा पराभव केला आणि स्पर्धा जिंकली. या कामगिरीची दखल घेत बीसीसीआयने भारतीय संघाला २१ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. बीसीसीआयने जाहीर केलेली बक्षिसाची रक्कम क्रिकेटपटू, प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी, संघ व्यवस्थापनातील अधिकारी या सर्वांमध्ये वाटली जाणार आहे.

पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी भारतीय पर्यटकांची हत्या केली. या घटनेनंतर भारताने ऑपरेशन सिंदूर करुन अतिरेक्यांचे तळ नष्ट केले. भारताच्या कारवाईला उत्तर देण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. पाकिस्तानच्या या प्रयत्नाला उत्तर म्हणून भारताने पाकिस्तानच्या निवडक हवाई तळांवर हल्ला केला. या घडामोडींमुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला होता. या पार्श्वभूमीवर एशिया कप स्पर्धा झाली. ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा असल्यामुळे पाकिस्तान विरुद्ध खेळण्याची तयारी भारताने केली. तणावपूर्ण वातावरणात भारत आणि पाकिस्तान आमनेसामने आले. तणावाचा परिणाम स्पर्धेतील भारत – पाकिस्तान दरम्यानच्या तिन्ही सामन्यांवर दिसून आला. भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन करणे




टाळले. स्पर्धा जिंकल्यानंतरही भारताने एशियन क्रिकेट काउन्सिलचे अध्यक्ष असलेल्या पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांकडून पुरस्कार स्वीकारण्यास नकार दिला. मैदानात भारतीय क्रिकेटपटूंनी पुरस्कार स्वीकारत असल्याचा अभिनय केला. पण पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांकडून एशिया कप स्वीकारणे टाळले. यानंतर खेळाडूंनी हातात एशिया कप असल्याचा अभिनय करत फोटोसाठी पोझ दिल्या. हा प्रकार सोशल मीडियात चर्चेचा विषय झाला. देशभरातून भारतीय क्रिकेट संघाचे कौतुक झाले. पाठोपाठ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक एक्स पोस्ट व्हायरल झाली. क्रिकेटच्या मैदानातील ऑपरेशन सिंदूरसाठी पंतप्रधान मोदींनी भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन केले. यानंतर काही तासांनी बीसीसीआयची एक एक्स पोस्ट व्हायरल झाली. तीन दणके, शून्य प्रतिसाद, आशिया कप चॅम्पियन्स, संदेश पोहोचवला अशी सूचक पोस्ट करत बीसीसीआयने तिरंगा इमोजीचा वापर केला. दबावाखाली आणि तणावपूर्ण वातावरणा भारतीय संघाने केलेल्या कामगिरीचे बीसीसीआयने कौतुक केले.भारताने आतापर्यंत जिंकलेल्या आशिया चषक स्पर्धा : १९८४, १९८८, १९९०–९१, १९९५, २०१०, २०१६, २०१८, २०२३, २०२५

## सूर्या एकट्यात हात मिळवतो पण कॅमेरा समोर दिखावा करतो

### पाकिस्तानच्या कर्णधाराचा खळबळजनक दावा

कराची–भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात आशिया कपचा सामना पार पडला, ज्यात टीम इंडियाने पाकिस्तानवर ५ विकेटने विजय मिळवला. भारत पाकिस्तान संघ यंदाच्या स्पर्धेत तब्बल तीन वेळा समोरासमोर आले. तिन्ही वेळेला भारताने त्यांचा लाजिरवाणा पराभव केला. एवढंच नाही तर तिन्ही वेळेला टीम इंडियाच्या खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हात मिळवला नाही. आशिया कपमध्ये हात न मिळवण्याच्या भारतीय संघाच्या धोरणाला पाकिस्तानी कर्णधार सलमान अली आगा याने खेळाचा अनादर करणारे म्हटले. सलमानने असेही म्हटले की, क्रिकेटपटूंना आदर्श मानणाऱ्या तरुण चाहत्यांमध्ये यामुळे खेळाडूवृत्तीचे चांगले उदाहरण निर्माण होणार नाही.भारताने क्रिकेटचा अनादर केला : भारताने आशिया कपच्या फायनलमध्ये रविवारी पाकिस्तानला पाच विकेटने हरवले आणि विजेतेपद पटकावलं. पाकिस्तानी कर्णधाराने सामन्यानंतर पत्रकार परिषदेत म्हटले की, 'स्पर्धेत भारताने जे केले ते खरोखरच निराशाजनक होते. हस्तांदोलन न करून त्यांनी केवळ आपलाच नव्हे तर क्रिकेटचाही अनादर केला. चांगले संघ असे करत नाहीत जे त्यांनी केलं. आम्हाला



आमची जबाबदारी पार पाडायची होती म्हणून आम्ही स्वत: ट्रॉफी घेऊन फोटोशूटला गेलो. आम्ही तिथे उभे राहून आमचे पदके स्वीकारली. मला कठोर शब्द वापरायचे नाहीत, पण त्याचे वर्तन खूपच अपमानजनक होते'. सूर्यकुमार यादव खाजगीत हात मिळवतो : कर्णधार सलमान आगाने दावा केला की, 'सूर्यकुमारचे सार्वजनिक आणि खाजगी वर्तन वेगळे होते'. तो म्हणाला, 'स्पर्धा सुरू होण्यापूर्वी आणि स्पर्धेपूर्वीच्या पत्रकार परिषदेत त्याने माझ्यासोबत हात मिळवला होता. यानंतर, रेफरी च्या सुनावणीदरम्यानही त्याने हात मिळवला, पण जगासमोर आणि कॅमेऱ्यांसमोर, ते हात मिळवत नाहीत. मला खात्री आहे की तो दिलेल्या सूचनांचे पालन करत आहे, पण जर त्याला निर्णय घ्यायचा असता तर त्याने हात मिळवला असता'.

भारताला ट्रॉफी न देण्याचं केलं समर्थन : आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी पारितोषिक समारंभाच्या व्यासपीठावर उभे राहून ट्रॉफी घेण्याच्या निर्णयाचे समर्थन करताना सलमानने म्हटले की, 'भारताला पीसीबी प्रम ुखांकडून ट्रॉफी घ्यायची नव्हती म्हणून त्यांना ती देण्यात आली नाही'.

## सामना हारताच पाकिस्तानी सैन्याकडून सामान्य नागरिकांवर गोळीबार

दिल्ली–पाकव्याप्त काश्मीरमध्ये सध्या मोठे आंदोलन सुरु आहे. नागरिक शाहबाज शरीफ सरकारविरुद्ध निदर्शने करत आहेत. सोमवारी २९ सप्टेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या या आंदोलनाला रोखण्यासाठी सरकार सर्व सीमा ओलांडत आहे, लष्कराने नागरिकांवर गोळीबारही केला आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाकिस्तानी लष्कराने इतके प्रयत्न करुनही स्थानिक लोक मागे हटण्यास तयार नाहीत. घटनास्थळावरील अनेक व्हिडीओ समोर आले असून, एका व्हिडीओत आंदोलकांनी पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्याला पकडल्याचं दिसत आहे. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये काय सुरु आहे?पाकव्याप्त काश्मीर (पीओके) अलिकडच्या इतिहासातील सर्वात मोठ्या नागरी उठावांसाठी सज्ज होत आहे. अवामी कृती समितीने (एएसी) २९ सप्टेंबर रोजी संपूर्ण प्रदेशात बंदची हाक दिली आहे. लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले. संप अनिश्चित काळासाठी चालू राहू शकतो असे मानले जात होते. जनतेचा रोष पाहून, इस्लामाबाद सरकारने मोठ्या संख्येने सुरक्षा दल तैनात केले आणि गर्दीला आवर घालण्यासाठी रविवारी मध्यरात्रीपासून इंटरनेट बंद केले.



लोकांची नेमकी मागणी काय?

अवामी ॲक्शन कमिटी ही पिओके मधील एक नागरी समाज संघटना आहे जी अलिकडच्या काही महिन्यांत लोकप्रिय झाली आहे. दशकांपासून राजकीय आणि आर्थिक दुर्लक्ष केल्याचा उल्लेख करून, त्यांनी आपल्या बॅनरखाली हजारो लोकांना एकत्र केलं आहे. या गटाची ३८ –सूत्री संरचनात्मक सुधारणांची मागणी आहे, ज्यामध्ये पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या काश्मिरी निर्वासितांसाठी राखीव असलेल्या पीओ–के विधानसभेतील १२ विधानसभेच्या जागा रद्द करणे समाविष्ट आहे. स्थानिकांचा असा दावा आहे की यामुळे प्रातिनिधिक प्रशासन कमकुवत होते. इतर मागण्यांमध्ये अनुदानित पीठ, मंगला जलविद्युत प्रकल्पाशी संबंधित वाजवी वीज दर आणि इस्लामाबादने दिलेल्या दीर्घकाळापासून रखडलेल्या सुधारणांची अंमलबजावणी यांचा समावेश आहे. तत्पूर्वी, मुझफ्फराबादमधील गर्दीला संबोधित करताना, अवामी कृती समितीचे प्रमुख नेते शौकत नवाज मीर म्हणाले होते की, ''आमची मोहीम कोणत्याही संस्थेविरुद्ध नाही, तर ७० वर्षाहून अधिक काळ आपल्या लोकांना नाकारलेल्या मूलभूत हक्कांसाठी आहे. आता पुरे झाले. एकतर अधिकार द्या नाहीतर लोकांच्या रोषाला सामोरे जा''.सरकार आणि लोकांमध्ये तोडगा नाहीअवामी कृती समितीचे वाटाघाटी करणारे, पीओके प्रशासन आणि संघीय मंत्र्यांमध्ये मॅरेथॉन चर्चा झाली, परंतु तीन तासांच्या बैठकीनंतर वाटाघाटी रद्द झाल्या. समितीने उच्चभ्रू विशेषाधिकार आणि निर्वासितांच्या विधानसभा जागांवर तडजोड करण्यास नकार दिला. त्यानंतर शौकत नवाज मीर यांनी बंद सुरू ठेवण्याची शपथ घेतली आणि घोषित केले की, ''चर्चा अपूर्ण आणि अनिर्णीत होत्या.''

## लीसा काइटली मुंबई इंडियन्स महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी

मुंबई : मुंबई इंडियन्सने आज माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू



आणि दोन वेळा विश्वचषक विजेत्या लीसा काइटली यांची आपल्या महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. १९९७ आणि २००५ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या विश्वचषक विजेत्या संघाचा भाग राहिलेल्या काइटली या महिला क्रिकेटमधील सर्वात आदरणीय प्रशिक्षकांपैकी एक मानल्या जातात.

खेळाडू म्हणून त्यांच्या तेजस्वी कारकिर्दीबरोबरच ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि जागतिक दर्जाच्या अनेक प्रमुख लीगमध्ये प्रशिक्षक म्हणून मिळवलेला अनुभव, मुंबई इंडियन्स महिला संघाला अप्रतिम दृष्टीकोन व समृद्धी प्रदान करणार आहे. आधीच थझङच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ ठरलेल्या मुंबई इंडियन्स महिला संघाने फक्त तीन हंगामांत दोन वेळा विजेतेपद पटकावले आहे. २०२३ आणि २०२५ मध्ये मुंबई इंडियन्सने किताब जिंकला होता.

या निमित्ताने आपला आनंद व्यक्त करताना नीता एम. अंबानी म्हणाल्या, मुंबई इंडियन्स परिवारात लीसा काइटली यांचे स्वागत करताना आम्हाला अत्यानंद होत आहे. लीसाने आपल्या उत्कटतेने क्रिकेटच्या अनेक पिढ्यांना प्रेरित केले आहे. त्यांचा प्रवेश हा मुंबई इंडियन्ससाठी रोमांचक आणि नवा अध्याय ठरणार आहे, कारण आता आम्ही आणखी उंच भरारी घेण्यासाठी सज्ज आहोत.

## आपल्या देशाचे नेते फ्रंटफुटवर येऊन बॅटिंग करतात, मोदींच्या ट्वीटनंतर सूर्याने पाकिस्तानला डिवचले

नवी दिल्ली,२९ सप्टेंबर (पीएसआय) आशिया कपच्या अंतिम फेरीत भारताने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. तिलक वर्माच्या आक्रमक खेळीच्या जोरावर भारताने पाकिस्तानला पराभूत केले. भारताने आशिया कप जिंकताच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्वीट करत संघाचे अभिनंदन केले होते. मात्र, मोदींच्या ट्वीटमधील ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख पाकिस्तानला खटकला. नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विजयाला ऑपरेशन सिंदूरशी जोडून टीमला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यावर आता टीमचा कॅप्टन सूर्यकुमार यादवनं देशाचे नेते फ्रंटफूटवर येऊन फलंदाजी करतात हे खूप चांगलं वाटतं असं म्हटलं.



भारतीय क्रिकेट टीमचा कॅप्टन सूर्यकुमार यादवनं नरेंद्र मोदींनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल बोलताना म्हटलं की, ''चांगलं वाटलं जेव्हा देशाचे नेते फ्रंटफुटवर येऊन बॅटिंग करत आहेत. हे असं आहे , तेच स्वत: स्ट्राईक घेत धावा करत आहेत. हे पाहून चांगलं वाटलं, आणि जेव्हा सर पुढे उभे असतील तेव्हा निश्चितपणे खेळाडू मोकळेपणानं खेळतील.''मोहसीन नक्कीच्या हस्ते ट्रॉफी न स्वीकारण्यावर सूर्या काय म्हणाला? भारतानं पाकिस्तानला आशिया चषकाच्या फायनलमध्ये पराभूत केल्यानंतर आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्कीच्या हस्ते आशिया कपची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता. याबाबत बोलताना सूर्यकुमार यादवनं म्हटलं की, मी याला वाद म्हणणार नाही, लोकांनी ट्रॉफीचे फोटो इथे तिथे पोस्ट केले आहेत. मात्र, खरी ट्रॉफी तेव्हा असते जेव्हा तुम्ही लोकांचं मन जिंकता, जे लोक पडद्याच्या मागं काम करतात ते खरे ट्रॉफी आहेत. खरी ट्रॉफी मैदानावर या सर्व लोकांचं काम आणि प्रयत्न आहे, असं सूर्यकुमार यादवनं म्हटलं. सूर्यकुमार यादवनं म्हटलं की सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पूर्ण देश आनंद साजरा करतोय. जेव्हा आम्ही भारतात परत जाू तेव्हा खूप चांगलं वाटेल आणि आम्हाला चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळेल. मोदींकडून ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत शुभेच्छा भारतानं तिलक वर्माच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर पाकिस्तानला अंतिम फेरीत ५ विकेटनं पराभूत करत नवव्यांदा विजेतेपद मिळवले. पूर्ण स्पर्धेत भारतानं एकही सामना गमावला नाही. पाकिस्तान आणि भारत आशिया चषकात तीन वेळा आमने सामने आले. भारतानं तीन सामन्यात पाकिस्तानला पराभूत केले. भारताच्या विजयानंतर नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत म्हटले की '' ऑपरेशन सिंदूर खेळाच्या मैदानात, निकाल सारखाच, भारताचा विजय, आपल्या क्रिकेटपटूंना शुभेच्छा''

भारताने कॅप्टन सूर्यकुमार यादवने आशिया कपमधून मिळणारं पूर्ण मानधन भारतीय सैन्य आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यातीन पीडितांना दान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने एक्सवर पोस्ट करत म्हटलं की मी या मालिकेचे पूर्ण मानधन आपल्या सशस्त्र दलांना आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना दान करण्याचा निर्णय घेतला आहे.

## टेस्ट सीरिजपूर्वी स्टार क्रिकेटरने घेतली निवृत्ती, १४ वर्षाच्या कारकिर्दीचा अखेर शेवट



**इंग्लंडचा वेगवान गोलंदाज अष्टपैलू क्रिकेटपटू क्रिस वोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने सोशल मीडियावर निवृत्तीची घोषणा केली. वोक्स २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषक जिंकणाऱ्या इंग्लंड संघाचा भाग होता. दोन महिन्यांपूर्वी त्याने भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यात दुखापतग्रस्त हाताने फलंदाजीही केली होती. वोक्सने तिन्ही फॉरमॅटमधील जर्सी घातलेला आपला फोटो सोशल मीडियावर शेअर केला. त्याने लिहिले, इंग्लंडकडून खेळणे आनंददायी आहे. माझ्या कारकिर्दीत मला कोणताही पश्चात्ताप नाही. वेळ आली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची हीच योग्य वेळ आहे असे मी ठरवले आहे. वोक्सने पुढे लिहिले, मी लहानपणापासून इंग्लंडकडून खेळण्याचे स्वप्न पाहिले होते. हे स्वप्न पूर्ण करू शकलो हे माझे भाग्य आहे. इंग्लंडकडून खेळत असलेल्या माझ्या १५ वर्षांच्या काळात, मी अनेक चांगले मित्र बनवले आणि हेच माझ्यासाठी खास आहे.**

दिल्ली–आशिया कप २०२५ नंतर आता टीम इंडिया वेस्टइंडीज विरुद्ध दोन सामन्यांची टेस्ट सीरिज खेळणार आहे. टीम इंडियाने त्याची शेवटची टेस्ट सीरिज इंग्लंड विरुद्ध खेळली जी २–२ अशा बरोबरीत सुटली. मात्र या सीरिजमध्ये सहभाग घेणाऱ्या एका स्टार क्रिकेटरने अचानक निवृत्तीची घोषणा केली आहे. खेळाडूने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घेतला असून त्याचे करिअर १४ वर्षांचे राहिले. महत्वाची आणि मोठी गोष्ट अशी की या खेळाडूला आगामी सीरिजसाठी संघात निवडले गेले नव्हते.इंग्लंडचा अनुभवी ऑलराऊंडर ख्रिस वोक्सने वयाच्या ३६ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. २०१३ मध्ये पदार्पण करणाऱ्या ख्रिस वोक्सने इंग्लंडसाठी २१७ सामने खेळले आणि संघाला अनेक अविस्मरणीय क्षण दिले. निवृत्तीची घोषणा करताना वोक्स म्हणाला, मआंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची हीच योग्य वेळ आहे असे मी ठरवले आहे. लहानपणीच मी मागच्या बागेत खेळण्याचे स्वप्न पाहत होतो तेव्हापासून मला इंग्लंडसाठी खेळायचे होते. आणि ते स्वप्ने मला जगण्यासाठी संधी मिळाली यासाठी मी खूप भाग्यवान आहे असे मला वाटतेफ

ख्रिस वोक्सचं क्रिकेट करिअर : इंग्लंडचा अनुभवी ऑलराऊंडर ख्रिस वोक्सची क्रिकेट कारकीर्द ही २०११ पासून सुरु झाली, त्याला इंग्लंडकडून पदार्पणाची संधी मिळाली. त्याने ६२ टेस्ट सामने खेळले ज्यात त्यानं १९२ विकेट्स घेतल्या आणि पाच वेळा एका डावात पाच विकेट्स घेतल्या. त्याने २०१८ मध्ये लॉर्ड्सवर भारताविरुद्ध शतकही ठोकलं होतं. त्याने १२२ वनडेमध्ये १७३ विकेट आणि ३३ टी२० सामन्यांमध्ये ३१ विकेट्स घेतल्या आहेत.

एशेज सीरिजसाठी संघात मिळालं नाही स्थान : इंग्लंडचा संघ एशेज सीरिज २०२५–२६ साठी नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. येथे दोन्ही संघ पाच टेस्ट सामने खेळतील. या सीरिजसाठी इंग्लंडचा संघ नुकताच जाहीर करण्यात आला. पण या संघात क्रिस वोक्सचा समावेश नव्हता. त्यानंतर अवघ्या सहा दिवसांमध्ये त्याने निवृत्तीची घोषणा केली. संघात स्थान न मिळाल्यामुळे त्याने हा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे.

क्रिस वोक्सने एका हाताने केली फलंदाजी : भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात झालेल्या ५ व्या टेस्ट सामन्यादरम्यान इंग्लंडचा गोलंदाज क्रिस वोक्सच्या डाव्या खांद्याला दुखापत झाली होती. मात्र संघाला गरज असताना क्रिस वोक्स दुखापतीनंतरही एका हाताने फलंदाजी करत होता. ज्यामुळे त्याचे खूप कौतुक करण्यात आले.

# उत्कृष्ठ संयोजनाबद्दल जवाहर महाविद्यालयाचा सत्कार



**धाराशिव/प्रतिनिधी :** अणदूर या ग्रामपंचायतीच्या खेडयातून सुरु झालेला जिल्हा युवक महोत्सवाचा प्रवास छत्रपती संभाजीनगर या महापालिकेच्या शहरात केंद्रीय युवक महोत्सवाच्या समारोप यासोबतच थांबला. चारही जिल्हयात उत्कृष्ट आयोजन करण्याऱ्या संयोजक महाविद्यायांचा गौरव यावेळी करण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समारोपप्रसंगी चार ही जिल्हयातील संयोजक महाविद्यार्थ्यांच्या मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी व अभिनेते वैभव मांगले यांच्या हस्ते करण्यात आला.

जिल्हा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, उप प्राचार्य डॉ. रवी पाटील, सांस्कृतिक प्रतिनिधी डॉ.गणेश मोहिते, डॉ.माणिक भताने यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित, डॉ.विनोद जाधव, र.ब.अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.रजनी शिखरे, डॉ.समाधान इंगळे, डॉ .अरुण जाधव, डॉ. वृषाली गव्हा१णे, डॉ. सतीश जाधव, तसेच जवाहर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चंनशेट्टी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.अंकुश कदम व प्रा.अनिता मुद्लकलना यांचा युवक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला.या सर्व महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य व संयोजना सहभागी घेतलेल्या सर्वांबद्दल डॉ.कैलास आंभुरे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

**पाऊसही कलावंतांना थांबवू शकला नाही...**

मराठवाड्यात यंदा पावसाने कहर केला असताना नेमकं याच काळात आलेल्या चार जिल्हा व एका केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात यशस्वीरित्या करण्यात आले. या अतिवृष्टीमुळे नद्या, नाले , रस्ते तुडुंब भरलेले अगदी पिकही पाण्यात गेलेली असताना युवा कलावंतांच्या उत्साहाला मात्र साक्षात वरून राजाही बांध घालू शकला नाही. तब्बल तेरा वर्षानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा युवक महोत्सव यंदापासून जिल्हानिहाय घेण्याचे ठरले. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समितीच्या बैठकित हा निर्णय घेण्यात आला. गणेश उत्सवानंतर ८ ते २९ सप्टेंबर या काळात महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यजमानपदासाठी प्रत्येक जिल्हयात एक महाविद्यालय निवडण्यात आले.

या नियोजनानुसार धाराशिव जिल्हा – जवाहर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अणदूर ता.तुळजापूर – ८ व ९ सप्टेंबर, बीड जिल्हा – र.ब.अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि.बीड दि.११ व १२ सप्टेंबर, जालना जिल्हा – मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे वरिष्ठ महाविद्यालय, अंबड, जि.जालना, १५ व १६ सप्टेंबर व छत्रपती संभाजीनगर – देवगिरी महाविद्यालय,१९ ते २० सप्टेंबर या प्रमाणे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले विशेष म्हणजे या महाविद्यालयांच्या संस्थांचालकांनी देखील महत्वाच्या खर्चासाठी कसलीही काटकसर केली नाही. जिल्हानिहाय महोत्सवामुळे मुलींची संख्या दीड पटीने वाढली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळाले. या चारही जिल्ह्यांचे महोत्सव संपल्यानंतर २७ ते २९ सप्टेंबर या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुख्य परिसरात केंद्रीय युवक महोत्सव घेण्यात आले.

कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सवाचे नियोजन करण्यात आले. सल्लागार समिती, संयोजन समिती, जिल्हा समन्वयक व विद्यार्थी विकास विभागाचे कर्मचारी महोत्सवासाठी परिश्रम घेतले. विद्यार्थी कल्याण संचालक डॉ कैलास अंभूरे व सहकाऱ्यांनी अविरत मेहनत घेऊन हा महोत्सव यशस्वी करून दाखविला. भोजन समितीचे अध्यक्ष डॉ.भगवान साखळे यांच्यासह सदस्यांनी उत्तम नियोजन केलं. विशेष म्हणजे यंदाच्या महोत्सवाच्या भोजनाचा दर्जाही उत्तम असल्याची प्रतिक्रिया सहभागी कलावंतांनी दिली.

## दयानंद विज्ञानमध्ये जॉन सी.शीहान यांची जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ व औषध संशोधक जॉन क्लार्क शीहान यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी जॉन सी.शीहान यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून केली.त्यानंतर बी.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थी गौरी गवळी हीने शीहान यांच्या जीवनप्रवास व संशोधन योगदानाचा आढावा सादर केला.

याप्रसंगी प्रा.अनुराधा शिंदे, प्रा.ऋतुजा डिग्रसकर, प्रा.तृप्ती सोनकांबळे, प्रा.आऊ येळीकर यांच्यासह विभागातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.

## दुर्गा सप्तशती पठनाने श्री. कालिका मंदिरात भक्तिमय वातावरण



**सोलापूर/प्रतिनिधी :** येथील विश्वब्राम्हण समाज कालिका सेवा मंडळाच्या वतीने शुक्रवार पेठेतील श्री. कालिका मंदिरात अश्विन शु. प्रतिपदा ते अश्विन शु.दसमी शके १९४७ सोमवार दि. २२ सप्टेंबर ते २ऑक्टोबर २०२५ पर्यंत दररोज श्री. कालिका मंदिरात दुर्गा सप्तशती पठन सुरु असून त्याचे शुभारंभ सौं व श्री. ओंकार कुरुलकर यांचे कडून करण्यात आले . सौं. शैलजा कुरुलकर, सौं प्रतिभा महामुनी कु. रेखा जोशी दररोज सकाळी ९ ते दुपारी एक वाजेपर्यंत ४० ते ४५ महिला भाविकासह सप्तशती पठन करीत आहेत. त्यामुळे श्री. कालिका मंदिरात भक्तिमय वातावरण आहे. मंदिरात दररोज सकाळी १० वाजता कुमारी पूजन करण्यात येते. नवरात्री चे पहिले दिवशी माँ दुर्गेची पहिल्या स्वरूपाची शैल पुत्रीची पूजा करण्यात येऊन भाविकांनी नऊ दिवस उपवास करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि सुख, शांती आणि समृद्धीची देवी शैलपुत्रीची प्रार्थना केली.ललित पंचमी दिवशी दि २६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी पाच वाजता कुंकूमार्चन व देवी सहस्त्रनाम पठन भक्तिमय वातावरणात पार पडले. उपस्थित सर्व भाविक भक्तांना ट्रस्ट चे अध्यक्ष श्री. उमेश कुरुलकर यांनी उपवास फराळाची व्यवस्था केली होती. अश्विन शुद्ध अष्ठमी मंगळवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी श्री. कालिका मंदिरात नवचंडी यज्ञाचे आयोजन केले असून त्याचे यजमान सौं. व श्री. ओंकार कुरुलकर हे आहेत.उत्समूर्ती व ग्रंथ पूजा दररोज नवरात्र महोत्सव समिती अध्यक्ष तथा खजिनदार श्री. नागेश कुरुलकर करीत आहेत. दुर्गा सप्तशती पठन करणाऱ्या सर्व महिला भाविकांना व इतर सर्व उपस्थिताना दररोज सकाळी १० वाजता अनुक्रमे सौं. स्वरूपा मंठाळकर, श्याम काळे, सौं.रेखा कुमठेकर, सोहम कुरुलकर, श्रीहरी कुरुलकर, संजयजी मैंदर्गीकर, प्रणव कुरुलकर, युवराज कुरुलकर,जयप्रकाश कुरुलकर आदि दुग्ध प्रसाद सेवा देत आहेत.श्री. कालिका मंदिरात नवरात्र मोठया उत्साहात साजरा केला जातो . दसऱ्याला विशेष महापूजा करून श्री. देवीचे अलंकार महापूजा मांडण्यात येते. तसेच मंदिरात वर्षभरात चैत्र गौरी हळदी कुंकू, श्रावणी, गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, श्रीमद भागवत सप्ताह, कोजागिरी पौर्णिमा, विश्वकर्मा जयंती, संत नरहरी महाराज समाधी सोहळा, आदि कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने साजरे केले जातात. तसेच समाज उपयोगी विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते . मकर संक्रन्तीचे वेळेस श्री. सिद्धेश्वर ग्राम यात्रेत सोनार समाजाचे चार व पाच क्रमांकाचे नंदिध्वज असून ते नंदिध्वज धरण्याचा मान सोनार समाजाचा आहे. सोनार समाज बांधव, सुवर्ण कारागीर, सराफ व्यावसायिक दररोज सकाळी श्री. कालिका देवीचे घेतल्याशिवाय त्यांचे दैनंदिन कामकाजास सुरुवात करीत नाहीत. एवढी दृढ भक्ती आहे. मंदिर समितीचे अध्यक्ष श्री उमेश कुरुलकर हे आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्वात प्रत्येक कार्यक्रमाचे आयोजन करून ते यशस्वीरित्या पार पाडण्यात येते. अशी माहिती नवरात्र महोत्सव समिती अध्यक्ष श्री. नागेश कुरुलकर यांनी दिली.

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा दसऱ्या दिवशी गळीत हंगामाचा शुभारंभ

### ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे राजेश कराड यांचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी :लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर कासार जवळा परिसरात येथे उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज या साखर कारखान्याचा पहिला चाचणी गळीत हंगामाचा शुभारंभ २ ऑक्टोबर २०२५ विजयादशमी गुरुवार रोजी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून या स्वप्नपूर्ती कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हिताची जपणूक व्हावी यासाठी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर कासार जवळा परिसरात उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड ॲग्रो इंडस्ट्रीज या साखर कारखान्याचा पहिला चाचणी गणित हंगाम विजयादशमीच्या दिवशी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, प.पु. विद्यानंद सागर महाराज गातेगावकर, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, हभप बाबा महाराज बोराडे काटगावकर आणि जिल्हा बँकेचे नाथसिंह मालक देशमुख गातेगावकर यांच्या शुभहस्ते होणार असून याप्रसंगी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख ॲड. बळवंतराव जाधव, अंबाजोगाई साखर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन दत्तात्रय आबा पाटील यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

सदरील गळीत हंगामाचा शुभारंभ विजया दशमी २ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या या स्वप्नपूर्ती सोहळ्यास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे भागधारक आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड आणि कारखान्याचे चेअरमन राजेश मालक कराड यांनी केले आहे.

## एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करा; धनगर समाजाची मागणी, आ. निलंगेकर यांना सकल धनगर समाजाचे निवेदन



**निलंगा/प्रतिनिधी :** सोमवारी दि. २९ सप्टेंबर रोजी निलंगा विधानसभा मतदारसंघातील निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ या तिन्ही तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने धनगर समाजाच्या संविधानिक देयक असलेल्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा मुद्दा विधानसभेत लक्षवेधी प्रश्न मांडून धनगर समाजाच्या आरक्षणाचा मार्ग मार्गी लावून समाजाला न्याय मिळवून द्यावा अशा मागणीचे निवेदन सकल धनगर समाजाच्या वतीने माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांना देण्यात आले, ऑल इंडिया धनगर महासंघ, नई दिल्ली, महाराष्ट्र राज्य, मुंबई च्या वतीने संस्थापक अध्यक्ष एडवोकेट गुंडेराव बनसोडे व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष झाटिंग अण्णा म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरील निवेदन देऊन निवेदनासोबत महत्वाचे पुरावे जोडले आहेत. यावेळी भगवान वरवटे, नामदेव काळे, सुग्रीव सूर्यवंशी, रघुनाथ वरवटे, बालाजी म्हेत्रे, बालाजी हुलगुत्ते, सुरेश म्हेत्रे, यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केली अतिवृष्टी ने झालेल्या नुकसानीची पाहणी

निलंगा/आयुब बागवान : शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी निलंगा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील, शिरूरानंतपाळ सह परीसरातील अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांच्या बांधावर जात व्यथा जाणून घेतल्या.

शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी निलंगा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शीअनंतपाळ निटूर, मुगाव, वंजारवाडा, शेंद शी अनंतपाळ तालुक्यातील ढोबळे वाडी उजेड सय्यद अंकुलगा डोंगरगाव सह शिवारातील पीक नुकसानीचे पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला अतिवृष्टी आणि ढगफुटीत सदस्य पावसाने निलंगा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे यामध्ये शेतकऱ्यांची जनावरे दगावली असून अनेकांच्या घरात पाणी शिरून संसार उपयोगी साहित्याची मोठे नुकसान झाले.असून राज्याचे शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे ऊपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी शेतीची शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत त्या त्या गावातली समस्या जाणून घेऊन स्थानिक प्रशासनाला मदत व पंचनामे करण्या साठी लातूर जिल्ह्याच्या कलेक्टर वर्षा ठाकूर घुगे मॅडम यांना फोन करून सध्याची परिस्थिती ऐकवत दोन्ही तालुक्यातील तहसीलदार, गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना तात्काळ जनतेच्या मदती साठी ग्राउंड वर येऊन मदत कार्य करण्याचे अहवान केले व स्वतः त्या त्या ठिकाणच्या स्थानिक प्रशासनाला फोन करून लोकांच्या मदतीसाठी जाण्याच्या सूचना केल्या. डोंगरगाव येथील एका शेतकऱ्याचे १९ शेळ्या पाण्यामध्ये वाहून गेल्या एक बैल वाहून गेला याबद्दल संबंधित सूचना करून या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी माने साहेब यांनी सूचना केल्या शिरूर अनंतपाळ येथे घरणी नदीच्या विळख्यात सापडलेल्या घरातील नागरिकांना स्थलांतरित करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात यावे अशी सूचना प्रशासनाला केली. शेतकऱ्यावर अतिवृष्टीचं भयान असं संकट आलेल असून या संकटातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासकीय स्तरावरून राज्याचे उपमुख्यमंत्री सन्माननीय एकनाथराव शिंदे साहेब यांना औसा ,निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ या चारही तालुक्यासह लातूर जिल्ह्यामध्ये प्रचंड नुकसान झालेला आहे . या भागातील सर्व शेतकऱ्यांना शासनाकडून अधिकची मदत देण्यासाठी सविस्तर असा अहवाल मांडून शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आग्रह करणार आहे असे मत जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने साहेब यांनी मांडले .



यावेळी एस टी कामगार सेनेचे राज्य चिटणीस व्यंकटराव बिरादार, युवा सेना जिल्हाधिकारी युवराज वंजारे, शिवसेना औसा तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, शिवसेना शी अनंतपाळ तालुका प्रमुख विकास शिंदे, लातूर शहर महानगर प्रमुख महेश चांदणे, शहर प्रमुख विनोद धुमाळे,तालुका समनवयक विद्याधर शिंदे, युवा सेना शहर प्रमुख अभिषेक शिरसाट, उप सरपंच भालचंद्र पाटील,महिला आघाडी तालुका प्रमुख अँड वर्षा ताई शिंदे, गायकवाड ताई, रेखाताई पुजारी , दैवताताई सगर, कवी गोविंद श्रीमंगल, दिलीप ढोबळे, मशीन सय्यद, निखिल मोहिते, रमेश मोहिते, शेषेराव पवार, लिंबराज पवार, कुमार मोगरगे, कदम, प्रवीण, मरडे, भुजंग पवार, लिंबराज जलमले शेतकरी शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## युवकांमध्ये विवेकाधिष्ठीत व्यक्तिमत्व निर्माण होणे आवश्यक -प्राचार्या डॉ. सविता शेटे

**लातूर/प्रतिनिधी :** येथील जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विवेक वाहिनी या उपक्रमाचे उद्घाटन दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालय उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन अंनिसच्या कार्यवाह प्राचार्या डॉ. सविता शेटे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. माधव बावगे श्री. अनिल गवारे व या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्राचार्या डॉ. सविता शेटे यांनी ‘‘आजच्या युगात विवेकशील विचारांची नितांत गरज आहे. युवकांनी अंधश्रद्धा, अंधानुकरण यांना बळी न पडता विवेकावर आधारित निर्णय घ्यावेत.’’ विद्यार्थी मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता, मानवतावादी आणि धर्मनिरपेक्ष विचार विद्यार्थ्यां मध्ये रुजावेत. यासाठी विवेक वाहिनी मार्फत असे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात अशावेळी विवेक वाहिनीच्या उपक्रमांत महाविद्यालयीन विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी विवेक वाहिनी महत्त्व सांगुन त्यांनी उपक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली.

सुरुवातीच्या प्रास्ताविकात डॉ. कोतमे धिरजकुमार यांनी पाहुण्यांचा परिचय देऊन विवेक वाहिनीची उद्दिष्टे स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. प्रविण अनभुले यांनी केले.



या उद्घाटन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजेश्वर खाकरे ,डॉ. रामेश्वर स्वामी, डॉ. राजेश कारंजकर ,डॉ केशव अलगुले, डॉ समीना शेख, प्रा. प्रज्ञा स्वामी डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. शरण निलंगेकर, डॉ. अरुण साळोखे, श्री. बजरंग चिवडे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शिक्षकांमुळे देशाची प्रगती - सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील



**चाकूर/प्रतिनिधी :** शिक्षकांमुळे देशाची प्रगती असून, शिक्षकांचे कार्य महत्त्वपूर्ण असून, शिक्षकांनी शिक्षकांच्या मदतीसाठी उभा केलेल्या शिक्षक पतसंस्था हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

ते चाकूर येथील यशवंत मंगल कार्यालयात जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित चाकूर २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी सहकार मंत्री नामदार पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संचालक अशोक गोविंदपूरकर,चनप्पा मुगदडे,नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, साईप्रसाद हिप्पाळे, चेअरमन बालाजी येळापुरे, मिलिंद महालिंगे, गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे, अनिलराव वाडकर,गटशिक्षणाधिकारी मंडोदरी वाकडे, गंगाधर अक्कानवरू, गणपत नितळे, पपन कांबळे, नितीन रेड्डी, संदीप शेटे, निलेश भंडे, सूर्यकांत चव्हाण, माझी गटशिक्षण अधिकारी दिलीप हैबतपुरे, विस्तार अधिकारी अशोक पांचाळ, निशिकांत मिरकले,भरत इगे , पतसंस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी, शिक्षक बांधव उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांना उभारण्याची गरज असून यासाठी शासन स्तरावर मी स्वतः प्रयत्न करणार आहे त्याचबरोबर इंग्रजी सुद्धा आपल्याला येणं गरजेचं आहे, तसेच शिक्षकांनी आपल्या संपत्तीकडे लक्ष देतात संतती लक्ष द्या. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे शिक्षण आपण या ठिकाणी दिलं पाहिजे. शिक्षकांचा काम पवित्र असून,आपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या बरोबरीने विद्यार्थ्यांना ज्ञानाजर्नाचे काम करावे असे ही सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पतसंस्थेचे अध्यक्ष बालाजी येळापुरे यांनी केले, संचालक प्रमोद हुडगे यांनी केले.

**सहकार मंत्र्यांनी पूरस्थितीमुळे सत्कार स्वीकारला नाही**

या कार्यक्रमात राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचा भव्य असा सत्कार शिक्षक पतसंस्थेच्या वतीने करण्यात येत होता मात्र राज्यात उद्भवलेल्या पुर परिस्थितीमुळे सहकार मंत्र्यांनी सत्कार न घेण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे कौतुक सबंध जिल्ह्यात होत आहे.

## देवीची मनोभावे आरती..



लातूरचा संतोषीमाता नवरात्री उत्सवनिमित्त मंगळवारी आरती करण्यात आली. यावेळी वैशाली निकते, वंदना कुलकर्णी, नंदा खंडेलवाल, राधिका खंडेलवाल, अनिता ठाकूर, आरती देवणीकर उपस्थित होत्या.

## दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे सृजनशीलतेचे संरक्षण यावर बौद्धिकसंपदा मार्गदर्शन कार्यक्रम व महाविद्यालय स्तरिय आविष्कार वैदिक समारंभ संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सृजनशीलतेचे संरक्षण यावर बौद्धिकसंपदा मार्गदर्शन कार्यक्रम व आविष्कार वैदिक समारंभ हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी भूषविले. संसाधन व्यक्ती म्हणून किशोर जेवे (संस्थापक व संचालक, एल.टी आर सॉफ्ट) व डॉ. श्रीकांत पंड्या (संचालक, इन्स्पाइर कॉमर्स अकॅडमी ) उपस्थित होते.

विशेष उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बाळासाहेब चव्हाण, बीसीए विभाग प्रमुख प्रा.शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ.वैशाली सातपुते, इन्क्युबेशन एनोव्हेशन व आविष्कार कक्षाच्या सामन्यायिका प्रा. निकिता अग्रवाल तसेच आविष्कार जिल्हा समन्वयक प्रा.अक्षय पवार, बौद्धिक संपदा हक्क कक्षाच्या समन्वयिका डॉ. लता जाधव यांचा समावेश होता.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या प्रत्येक छोट्या कल्पनेत मोठ्या इनोव्हेशनचे बीज दडलेले असते. महाविद्यालय स्तरावरूनच क्रिएटिव्हिटी व इनोव्हेशनला चालना दिल्यास विद्यार्थी भविष्यात समाजोपयोगी संशोधन, उद्योजकता आणि रोजगार निर्मितीमध्ये मोलाचे योगदान देऊ शकतात. म्हणूनच बौद्धिक संपदेचे महत्त्व ओळखणे आणि त्याचे प्रत्यक्ष आयुष्यातील उपयोग समजून घेणे आवश्यक आहे. किशोर जेवे यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, आजच्या डिजिटल युगात सृजनशीलतेचे संरक्षण खूप गरजेचे आहे. पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट या माध्यमातून स्वतःच्या कल्पना व निर्मितीचे संरक्षण करता येते. विद्यार्थी जर सुरुवातीपासून या बाबतीत जागरूक राहिले तर भविष्यात ते स्वतःचे उद्योजक बनू शकतात.

डॉ. श्रीकांत पंड्या यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना नमूद केले की, आजचे विद्यार्थी



फक्त शिक्षणापुरते न थांबता इनोव्हेशनकडेही वळले पाहिजेत. इनोव्हेशन हेच रोजगार निर्मितीचे व आत्मनिर्भरतेचे मुख्य साधन आहे. आविष्कार सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या आयडिया सादर करण्यासाठी व त्यांना पेटंट प्रक्रियेपर्यंत नेण्यासाठी महत्वाची पायरी ठरतात.

यासोबतच त्यांनी आविष्कारमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन केले व संशोधन तसेच सर्जनशील प्रकल्पांमध्ये सातत्य ठेवण्याचे आवाहन केले. या प्रसंगी आविष्कार महाविद्यालय स्तरिय स्पर्धेचे विजेते घोषित करण्यात आले. बौद्धिक संपदा हक्क कक्षाच्या समन्वयिका डॉ. लता जाधव यांनी प्रास्ताविक मांडले तर संसाधन व्यक्तींचे परिचय प्रा.साक्षी पाटील यांनी करून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.माहेश्वरी पटणे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. शेख सुहाना, प्रा. प्रसाद पाटील , प्रा. क्षितिज कांबळे, प्रा.अनुजा कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## सिध्द दाती ..

महादेवी सिध्ददात्री
रे रुप नववे नवराती
अष्टसिध्दी शंकराले
तुज मुळे होई प्राप्ती

अर्धनारीनटेश्वर नाम
नटराजाला देई उक्ती
मना मना करे वसती
शिवा सहीत पार्वती

नवरात्री सु संपन्नता
शांतरुप आदि शक्ती
भक्ता देती सिध्दता
चराचरी तव व्याप्ती

कमलस्थिता भार्गवी
आळविती श्रीसुक्ती
चतुर्भुजा कमलधारी
कमलनयनी आकृती

शंखचक्रगदाधारीणी
शब्दातीत ती महती
तांदूळ शिरा नैवैद्या
भवानीला अतिप्रिती

अलौकिक भावभक्ती
मातेची लेकरा प्रिती
सतत काळजी वाहते
आदिमाता लेकराप्रती

कुमारिकेचे पुजनांती
इतिश्री करे नवराती
सुखी कर समस्तजन
आर्त मनातून प्रार्थती

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## राज्यस्तरीय १३ व्या सकल जंगम समाज वधू वर परिचय मेळाव्याच्या अध्यक्षपदी शिवशंकर प्रभुलिंग स्वामी तर सचिवपदी त्र्यंबक गुरुनाथ स्वामी

**लातूर/प्रतिनिधी :** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी लातूर येथे राज्यस्तरीय तेरावा सकल जंगम समाज वधू वर परिचय मेळावा घेण्यासाठी ज्येष्ठ समाज बांधव शरणप्पा कलेमले यांच्या अध्यक्षतेखाली व कुमारस्वामी गणाचार्य महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत बिडवे हॉल राजीव गांधी चौक लातूर येथे जंगम समाज बांधवाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत मेळाव्याच्या अध्यक्षपदी शिवशंकर प्रभुलिंग स्वामी यांची तर सचिवपदी त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांची निवड करण्यात आली.

बैठकीच्या प्रथम जेष्ठ समाज बांधव शरणप्पा कलेमले यांना श्री.१००८ प्रसन्न रेणुकाविर सोमेश्वर राजदेशिकेंद्र महास्वामीजींच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल सकल लातूर जिल्हा जंगम समाज बांधवांच्या वतीने जेष्ठ समाज बांधव शरणप्पा कलेमले यांचा शिवशंकर प्रभुलिंग स्वामी यांच्या हस्ते



सत्कार करण्यात आला

तसेच लातूर येथील वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळास राज्य शासनाचा सलग दुसऱ्यांदा राज्यस्तरीय दुसरा व मराठवाडा स्तरीय पहिला पुरस्कार मिळाल्याबद्दल

वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाचे समाज बांधव आमोल दुबलगुंडी स्वामी यांचा ब्रह्मानंद बंडपा स्वामी साकोळकर यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला

या बैठकीत सर्वानुमते दरवर्षीच्या वधू वर परिचय मेळाव्याचे अन्नदाते शिवशंकर प्रभुलिंग स्वामी यांची गत वर्षीच्या कार्यकारणीने अध्यक्षपदी व सचिव पदी त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांची निवड केल्या बद्दल जेष्ठ समाज बांधव शरणप्पा कलेमले व कुमार स्वामी गणाचार्य महाराज यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन वधू वर परिचय मेळाव्याच्या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या

या वर्षीचा सन २०२५--२०२६ चा राज्यस्तरीय तेरावा सकल जंगम समाज वधू वर परिचय मेळावा रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी गिरवलकर मंगल कार्यालय लातूर येथे घेण्याचे ठरले.

या मेळाव्यासाठीचा संपूर्ण खर्च वधू वर परिचय नोंदणी पुस्तीकेतील जाहिरात माध्यमातून व या मेळाव्याच्या कार्यकारणीने करावयाचा असे ठरले. वधू वर परिचय मेळावा नोंदणी पुस्तीकेतील जाहीराती व्यतिरिक्त कोणाकडूनही रक्कम घ्यायची नाही असे ठरले.

या बैठकीत ब्रह्मानंद स्वामी साकोळकर,त्र्यंबक प्रभूअप्पा स्वामी बाभळगावकर ,शरणाप्पा दावणगिरे सर, बसवेश्वर स्वामी कोकलगे घरणीकर, पत्रकार सोमनाथ स्वामी डिगोळकर, वीरभद्र स्वामी, संजय स्वामी पानचिंचोलीकर, महादेव कंजय्या स्वामी हेळंबकर, अनिल स्वामी हरंगुळकर, अनिल रुद्रया स्वामी, चंद्रकांत स्वामी ,घुमे बालाजी नागनाथ, शिवराज करबसय्या स्वामी हे उपस्थित होते.

## साथीच्या रोगांपासून जनावरांच्या संरक्षणासाठी लातूर ग्रामीण मध्ये लसीकरण मोहीम हाती घेण्यात यावी

### प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते धिरज देशमुख यांची पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या कडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** अतिवृष्टी,पूर यामुळे मानवी जीवनासह पशुधन पिकांचे व मालमत्तेचे नुकसान तसेच पायाभूत सुविधांची हानी झाली आहे तर दुसरीकडे हवामानातील बदल व नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातील त्रुटी हे अतिवृष्टीशी संबंधित प्रश्न निर्माण झाले आहेत. यामुळे जनावरांमध्ये साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. साथीच्या रोगापासून जनावरांना संरक्षण मिळण्यासाठी लातूर, रेणापूर व औसा या तालुक्याच्या ठिकाणी लसीकरण शिबीराचे आयोजन करावे अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे.

या शिबीरांमध्ये जनावरांना आवश्यक औषधे आणि लसींचा पुरेसा साठा उपलब्ध करावा आणि भविष्यात अशा घटना अधिक वारंवार आणि विनाशकारी होण्याची शक्यता असल्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना अंमलात आणून या संदर्भात पशुपालकांमध्ये जनजागृती करावी अशी देखील मागणी करण्यात आली आहे.

तरी लातूर, रेणापूर व औसा या तालुक्याच्या ठिकाणी लसीकरण शिबीर आयोजन करण्या संदर्भात संबंधितास आदेशित करावे,असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## बचत गटाच्या महिलांना व्यवसायाची संधी: शोभा पवार

**औसा/प्रतिनिधी :** महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आणि बचत गटांना व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी औसा तालुक्यात औसा महिला ग्रो संस्थेच्या माध्यमातून महत्त्वाचे कार्य सुरू आहे. डिसेंबर २०२२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे नेतृत्व अध्यक्ष शोभा अभिमन्यू पवार करत आहेत. श्रावणबाळ योजना, विधवा परित्यक्ता महिला अर्थसाहाय्य योजना, लाडकी बहीण योजना आणि अन्न सुरक्षा योजना यांसारख्या योजनांची माहिती आणि लाभ महिला कॅडर्समार्फत थेट बचत गटांपर्यंत पोहोचवला जात आहे. तालुक्यातील बचत गटातील महिलांसाठी मसाला उद्योग, पापड उद्योग, लेडीज गारमेंट आणि मधमाशीपालन यांसारख्या उद्योगांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यास दौरे आयोजित करण्यात आले. यामुळे महिलांना व्यवसाय उभा करण्याचे ज्ञान मिळाले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**NOTICE FOR SRM**

The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur (the Employer) invites online (e-Tender) offers on percentage rate basis and under two bid system (technical bid and commercial bid) from civil contractors on Mahatransco e-tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | Name of works | Tender No. | Estimated cost (In Rs.) / time limit / EMD (In Rs.) | Cost of the Tender + GST (In Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Engaging outsource service UDC (F&A) (Skilled) & LDC (F&A) (Skilled) against sanctioned regular post under EHV CCCM Division Latur. | MSETCL/EEC/EHV/ CCCM/LTR/2025-26/ T-1 (HR) (RFX No.7000037754) | Rs. 1726774.00/- 11months/ Rs. 17267.74- | Rs. 590 |

**Start Dt. &Time: 29.09.2025 17:00**    **End Dt. &Time: 14.10.2025 17:00**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, MSETCL, Latur
The undersigned reserves all the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**EHV CCCM Division, MSETCL, Latur**



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade        Mo. 9422472502,        RNI 47034/64,        POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.   मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे  मो. ९४२२४७२५०२   आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६